# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १५.१२.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार **दिनांक १५ डिसेंबर २००६** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.०० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली . सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१४. स.स.सौ.लक्ष्मी आशन्ना शंकर
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२४. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ

२७. स.स.सौ.खान मेहेरूत्रीसा खान हमीद
२८. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२९. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३२. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
३३. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३४. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३५. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान निसार मो.खान
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.सौ.राऊत छाया विलास
४१. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४५. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४६. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४७. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४९. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५०. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५१. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५२. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५३. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५४. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५५. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५६. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५७. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५८. स.स.श्री.खुडे विजय किसन
५९. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६०. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६१. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६२. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६३. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे

६४. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६५. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६७. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६८. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६९. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७०. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७१. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७२. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७३. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७४. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७५. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७७. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
७८. स.स.श्री.बारवाल गजानन
७९. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०२. स.स.श्री.राजेश व्यास
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.संतोष खेंडके : विद्यानगर भागातील मंजूर लेआऊट मधील रहिवासी यांना जाण्यायेण्यासाठी रस्ता नाही. एकमेकांच्या संरक्षित भिंतीवरून ये-जा करतात. महापालिकेची परवानगी नसतांना तेथे तारकुंपन केलेले असून जाण्यास रस्ता नाही.या ठिकाणच्या नागरीकासाठी चार मी. चा रस्ता करून दयावा असे मा.न्यायालयाने सुध्दा निर्देश दिले आहे परंतु कार्यवाही झाली नाही.

श्री.अ.रशिद खान : पेट्रोलपंप आहे पैसेवाला व्यक्ती आहे.संबधीत व्यक्तीने तारकुपंन केले. मा.न्यायालयाचे आदेश आहे. रस्ता करून दयावा त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

श्री.संतोष खेडंके : जे ओनर आहे त्यांचे पी.आर कार्ड रद्द झालेले आहे. प्रशासन वेळोवेळी बैठका घेतात कुठेही त्या व्यक्तीचा मालकी हक्क लागू होत नाही. त्या भागात एखादा व्यक्ती आजारी पडला तर दवाखान्यात घेवून जाण्यासाठी रस्ता नाही. प्रशासन जे धनसम्राट लोक आहे त्यांना साथ देत आहे

श्री.अ.रशिद खान : तेथे रहिवासी नागरीक आहे. त्यांचेकडे पीआरकार्ड आहे. परंतू त्यांना जाण्यासाठी रस्ता नाही. समजदार आहे म्हणून ठिक आहे. नसता मारपीट केली असती. मा.न्यायालयाचे आदेश असतांनाही तारकुपंन काढण्यास प्रशासनास काय

अडचण येत आहे. गरीबांना अलग न्याय श्रीमतांना अलग न्याय प्रशासन देत आहे हे बरोबर नाही.

श्री. विजय खुडे : गेल्या दीड वर्षापासून सात घरातील लोकांना जाण्या येण्यास रस्ता नाही. तारकुपन घातलेले आहे. या संदर्भात वारंवार मा. आयुक्त. उपआयुक्त यांना कल्पना दिलेली असून लेखी पत्र ही दिले माजी महापौर. श्री.तणवानी व आपणही पाहणी केली. मा.न्यायालयाचे आदेश असतांनाही तार कुपंन काढले जात नाही.

श्री.त्र्यबंक तुपे :या संदर्भाने मा. न्यायालयाचे आदेश काय आहेत अतिक्रमण आहे की नाही प्रशसनाचे मत घ्यावे आजच्या आज या संदर्भात निर्णय घेण्यात यावा.

श्री. गजानन बारवाल : या ठिकाणी मी स्वत: पाहणी केली तेथील रहिवासी यांचेकडे संपूर्ण मालकी हक्का बाबतचे कागदपत्र आहे. ३० वर्षापासून ते लोक राहतात. त्यांना जाण्यायेण्यासाठी रस्ता नाही. त्वरीत तारकुपंन काढण्याचे आदेशीत करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा. न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतांना ४ मी. रस्ता करून दिला जात नाही. सहा मीटरचा रस्ता असावा दोन मी. जागा तुम्ही दया असा खोडा प्रशासनाने घातलेला आहे. मा. न्यायालयाच्या आदेशाची अमलबजावणी व्हावी.

मा. महापौर : मा.न्यायालयाचे काय निर्देश आलेले आहे याची माहिती विधी सल्लागार यांनी दयावी.

विधी सल्लागार :विद्यानगर आणि विजयनगर या प्रकरणी प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले होते. त्याचा दिवाणी दावा क्र ६६०/९२ असा आहे. श्री. चरणजीतसींग यांनी महानगरपालिका विरूध्द सि.टी.एस. १५१८७ अे १ बाबत दाखल केलेला होता. या प्रकरणी श्री.चरणजीतसिंग व इतर सहा व्यक्तींनी मा.न्यायालयात दिवाणी दावा क्र.६६०/९२ दावा दाखल करून प्लॉट नं.१ ते ७ चा पार्ट ले-आऊट प्लॅन दि.२३.०१.९२ च्या पत्रान्वये जो रिव्होक करण्याचे ठरविले ते रिव्होकेशन बेकायदेशीर ठरविणे बाबत आणि दि.११.०१.१९८८ च्या मंजूरीनुसार जे तारकुंपन करण्याची मंजूरी दिली होती ती परवानगी रद्द करण्याची कार्यवाही बाबत संबंधीताने दिवाणी दाव्यात विनंती केली. तसेच प्रतिवादी महानगरपालिका यांना तारकुंपन अँगल काढून टाकण्याच्या कार्यवाहीस प्रतिबंध करण्याची विनंती केली. वरील प्रकरणी मा.न्यायालयात सुनावणी होवून पार्ट ले-आऊट रिव्होकेशनची कार्यवाही प्लॉट नं.१ ते ७ साठी बेकायदेशीर ठरविलेली आहे. कायदेशीर पध्दतीचा अवलंब केल्याशिवाय तेथे रस्ता तयार करण्यास प्रतिबंध केले आहे. तसेच तारकुंपन रद्द करण्याची कार्यवाही ही बेकायदेशीर ठरविलेली आहे. कायदेशीर पध्दतीचा अवलंब केल्याशिवाय प्लॉट नं.१ ते ७ मधून रस्ता करण्यास मनाई केलेली आहे. हा निकाल दि.०५.१०.२००५ रोजी मा.न्यायालयाने दिला आहे. त्या विरूध्द मनपाने आर.सी.ए.नं.३३८/२००५ हे अपील दाखल केलेले आहे. मा.जिल्हा न्यायालयाने आर.सी.ए.न.३८८/५ नुसार मनपा विरूध्द चरणजीतसिंग व इतर या अपीलामध्ये दि.१०.१०.२००६ रोजी जजमेंट देवून अपील भागश: मंजूर केले आहे.

श्री.संजय जोशी :सहा.संचालक यांचे मत काय आहे याचा खूलासा आताच विधी सल्लागार यांनी दिला. चार मी. रस्ता करावा असे न्यायालयाने आदेशीत केलेले असतांना कार्यवाही होत नसेल तर आदेशाची पायमल्ली होत आहे. चार मी. रस्ता जरी लेआऊटमध्ये नसेल तरी जागेवर प्राप्त परीस्थितीनूसार निर्णय घेण्याचे अधीकार प्रशासनास आहे. ६ मी. रस्ता करता येत नसेल तर किमान ४ मी.चा करून दयावा.

श्री.संतोष खेंडके : लेआऊटला मंजूरी केंव्हा दिलेली होती.

मा.महापौर : लेआऊटला मंजूरी देतांना रस्ता किती फुटाचा दिलेला आहे.

सहा. संचालक(न.र.) : लेआऊटमध्ये रस्ताच नाही.

श्री.संजय जोशी : जरी लेआऊटमध्ये रस्ता नसेल तरी जेंव्हा दोन लेआऊट एकमेकांना जोडतो तेंव्हा मध्ये अप्रोच रस्ता पाहिजे. हा नियम आहे.

श्री.संतोष खेंडके : एस.एस.कुलकर्णी यांनी मा.न्यायालयात सन २००२ मध्ये साक्ष दिली की विद्यानगरचा लेआऊट मंजूर करतांना विद्यानगरचा रेकॉर्ड पाहणी गरजेचे आहे. पटवारी यांचे घराच्या बाजूला पश्चिमेला २० फुट रूंदीचा जोड रस्ता दाखविलेला आहे. तो रस्ता दक्षिण उत्तर आहे .

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: लेआऊट मंजूर झाला तेंव्हा रस्ता दिला असेल. प्लॉट म्हणून विक्री केला असेल. त्याचा मालक कूणी नसेल. रस्ता दिल्या शिवाय लेआऊटला मंजूर दिली जात नाही. कुठेना कुठे रस्ता दिलेला असेलच.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : लेआऊटही दोन एकर पेक्षा जास्त मंजूर केला म्हणून रद्य ही केलेला आहे.

श्री.अ.रशिद खान : तार कुपंन काढण्यात यावे तेथील नागरीकांना रस्ता तयार करून दयावा.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स. सभासद एकत्र येतात व मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : सीटीएस नं.१५१८७ च्या संदर्भात चर्चा चालू आहे. ही वसाहत गेल्या २० वर्षापासून विकसीत झालेली आहे.विदयानगर व विजयनगर असे दोन बाजूने दोन वेगवेगळे लेआऊट आहे.तेथील नागरीकाची अशी मागणी आहे की येथील रस्त्याने आम्ही जा ये करीत होतो तो आता बंद करण्यात आलेला आहे. त्यामूळे माजी महापौर तसेच मा. आयुक्त व इतर पदाधिकारी यांनी तेथे पाहणी केली.सर्वे झालेला होता. या सभागृहात त्या संदर्भात चर्चा ही झालेली होती व एका लेआऊटला स्थगिती दिली असे उत्तरही सहा. संचालक नगररचना यांनी दिले होते. लेआऊटला मंजूरी देत असतांना तेथे ती जागा रिकामी होती तेथे कूठलेही बांधकाम झालेले नव्हते. परंतू कोणताही लेआऊट होवून २२ वर्ष झाले त्यामध्ये काही सुधारण दुरूस्ती करावयाची असेल तर वृत्तपत्रात जाहीरात देणे आवश्यक होते.ती स्थावर मालमत्ता आहे त्या व्यक्तीने ती किरायाने दिलेली आहे किंवा विक्री केलेली आहे त्या जागेचा मोबदला देण्याची नियमात तरतूद आहे. असे असतांना देखिल जी परवानगी दिली ती कोणत्या नियमाने दिलेली आहे मध्येच काही दिवस न्यायालयाचे स्थगिती होती ती उठलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे माजी महापौर श्री.तनवाणी यांनी प्रत्यक्ष भेट दिली त्यावेळी तेथील स्थगिती ओदश

उठलेले होते. दोन्ही लेआऊटची काही बाधा असेल तांत्रिक अडचणीमध्ये न जाता दोन्ही मालकास एकत्र करून कायदयाच्या तरतूदीनूसार कार्यवाही करावी. व तेथील नागरीकाची गैरसोय होते त्या बाबतीत तोडगा काढावा.

श्री.राजेश व्यास : विदयानगर लेआऊटमध्ये दोन मीटरची जागा बांधकाम परवानगी घेतांना मागच्या बाजूने ये जा करण्याची जागा दाखवलेली होती. पूढच्या बाजूला जागा नव्हती. आता मा. न्यायालयाचा निकाल लागलेला आहे की चार मीटरचा रस्ता करावा म्हणून विदयानगर वाले ६ सहा मीटर रस्ता करण्यासाठी जागा देण्यास तयार नाही त्यासाठी ६ मीटरचा रस्ता होण्यासाठी विदयानगर यांचेकडून दोन मीटर जागा घेवून व विजयानगर यांचेकडून ४ मीटरची जागा घेवून सहा मीटरचा रस्ता करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :त्या पूर्ण लेआऊटचे ७२ पी.आर.कार्ड रद्य आहे.आयुक्त श्री.गारे साहेब असतांना स्थगिती दिली होती. ते रद्य होवून ३ वर्ष झाले. अनाधिकृत काम तेथे होत आहे. तारकुंपन काढण्यात यावे.

मा.आयुक्त : हा विषय दोन लेआऊटच्या मधील आहे. हा फारच जुने प्रकरण आहे. सन १९९३-८४ मध्ये हा विषय समोर आला होता त्यावेळी प्रशासन होते. विदयानगरचे जे पाच सहा प्लॉट आहे त्या मागे १० फुटचा रस्ता लेआऊटमध्ये मजूर करण्यात आला होता. परंतू त्यावेळी प्रशासन यांनी असे दिले होते की जो काही पाठीमागील रस्ता आहे तो २० फुट करण्यात यावा व पाठीमागून जे काही जास्तीचे देत आहे त्याचा त्यांना एफएसआय देण्यात यावा.सध्या दोन्ही लेआऊ खाजगी आहे. जे दोन्ही मालक आहे त्यांचे अधिकार आहे महानगरपालिकेचे अधिकार लिमीटेड आहे. जेंव्हा मी रूजू झालो तेंव्हा पहिल्याच महिण्याचा हा विषय समोर आला होता. आता मा.न्यायालयाने दिलेला निर्णय त्या प्रमाणे विषय प्रशासनाने आपल्या समोर मांडलेला होता.मा.न्यायालयाने ४ मीटरचा रस्ता करावा म्हणून म्हटले परंतू आपल्या रूल मध्ये ६ मीटरचा रस्ता असावा त्यामूळे ६ मीटरचा करणे आवश्यक आहे. मी विनंती केली होती त्यावर सहा मीटरचा एक नॉन डीपी रोड टाकू जो पर्यत नॉन डीपी रोड टाकत नाही तोपर्यत कोणताही अधिकार आपल्याला प्राप्त होत नाही. डी.सी रूल प्रमाणे सहा मीटरचा रस्ता आवश्यक आहे. तसा प्रस्ताव दिला होता तो आपण नामंजूर केला. नसता एक वर्षापूर्वीच काम झाले असते.जर मान्य केले असते तर जाहीर प्रगटन देवून सजेशन ऑब्जेक्शन मागविले असते. पूढील कार्यवाही केली असती. मा.न्यायालयाने दिलेला निर्णय बरोबर आहे परंतू कायदयाप्रमाणे सहा मीटरचा रस्ता असावा. कारण तेथे चार मीटरचा रस्ता केल्यास, ॲम्ब्युलन्स तसेच अग्निशमन विभागाचे तातडीच्या वेळी वाहन जायला पाहिजे.

मा.महापौर : तार फेन्सिंगला परवानगी आहे का ?

मा. आयुक्त : या संदर्भात संबधीतांस नोटीस दिलेली होती. त्यांचे विरूध्द संबधीतानी मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश आणले. त्या स्थगिती आदेशाच्या विरूध्द अपील

चालू होते. दोन दिवसापूर्वी मा. न्यायालयात प्रशासन गेलेले आहे ४ मीटर हे कायदयात बसत नाही सहा मीटरचा रस्ता करावयास पाहिजे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जी तार फिन्सींग आहे त्यास परवानगी आहे आपली दिशाभूल करीत आहे. चार मीटर पूढे घेतलेले आहे. पूर्ण चौकशी होईपर्यत कोणतीही कार्यवाही करू नये. चार मीटर रस्ता विजयनगर वाले देण्यास तयार आहे दोन मीटर विदयानगर यांचेकडून घेवून सहा मीटरचा रस्ता तयार करावा.

श्री. संतोष खेडके : मा. न्यायालयाचे आदेश हे दिं. १०.१०.२००६ रोजीचे आहे.

मा.उपमहापौर : तो खाजगी लेआऊट आहे असे मा. आयुक्तांनी म्हटले परंतू दोन लेआऊटला मंजूरी देतांना रस्ता सोडण्याची तरतूद आहे व तेथील नागरीकांना सुविधा पुरविण्या बाबत मागणी करण्याचे त्यांचे अधिकार आहे. त्यात लाईट रस्ता . पाणी असेल, तेथील नागरीकांचा रस्ता बंद होत असेल तर तांर फिन्सिंग का काढण्यात येवू नये.मा. न्यायालयाचे आदेश आहे तेथे २४ तासाच्या आत रस्ता करून देणे बाबत आदेशीत करावेत.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :या जागेवर मा. महापौर यांनी पाहणी केली. जेंव्हा मा. न्यायालयाने आदेशीत केले त्यानूसार पहिल्यांदा तार कुंपन काढण्यात यावे नंतर वाटाघाटी करून रस्ता करून देण्याची कार्यवाही करावी. मा.न्यायालयाच्या निर्णयास आपण बंधनकारक राहावे. महानगरपालिकेच्या नियमात जे बसते त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:कुणी प्लॉट घेतला व जागा कूणाची आहे. तार फिन्सींग काढले तर कन्टेम ऑफ कोर्ट मॅटर झाले तर कोण जबाबदार राहणार आहे. चार मीटर जागा पाहिजे ते देण्यास तयार आहे वाटाघाटी करण्याची ही वेगळी पध्दत करू नये जर तार कुपंनला परवानगी असेल तर कोणत्या अधिकारांने आपण काढू शकतो.

मा.महापौर : सदर ठिकाणी मी स्वत: गेलेलो होतो मा.आयुक्तांनी पाहणी केलेली आहे संबधीत अधिकारीही होते मा.न्यायालयाचे आदेश आहे की चार मीटरचा रस्ता करून दयावा नियमानूसार ६ मी. रस्ता असणे गरजेचे आहे म्हणून विदयानगर कडील लोकांकडून दोन मीटर व चार मीटर विजयनगरकडून घ्यायचा अशी मागणी केली.

श्री.काशिनाथ कोकाटे : रस्त्याचा मोबदला कोण देणार आहे. याचाही खूलासा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: ज्याची तक्रार आहे कंपाऊडकडील चार मीटर रस्ता संध्याकाळ पर्यत काढून देतो. त्यांचेशी मी चर्चा केली. आदेश देवू नये.

मा. आयुक्त : जो चार मीटरचा रस्ता ज्यांचेकडून घेण्याचा आपण प्रयत्न करीत आहे त्याची जागा ही खाजगी असल्या मूळे त्यावर आपला अधिकार नाही. त्यांनी स्वत: हून दिल्यास हरकत नाही. परंतू आता तार फींसीग काढली व दुसऱ्याच्या मालकीच्या जागेतून जाण्याची परवानगी आहे असे आपण कूणालाही म्हणू शकत नाही. डी. सी रूल प्रमाणे सहा मीटरचा रस्ता असणे आवश्यक आहे

मा. महापौर : मा. न्यायालयाचे आदेश चार मीटर रस्ता करण्याचे आहे. प्रशासनाचे मत सहा मी. रस्ता असावा. समोरचा व्यक्ती एक मीटर रस्ता देण्यास तयार आहे. त्याचेशी चर्चा केली. त्यानूसार एकूण पाच मीटरचा रस्ता करण्यात यावा.आज सध्याकांळ पर्यत तार फिन्सींग काढण्यात यावे.

श्री. रेणुकादास वैद्य	: मा.न्यायालयाचे आदेश चार मीटरचा रस्ता करावा असे आहे त्यानूसार कार्यवाही करावी.

श्री.संजय सिरसाट	: तार कुंपन काढणार आहे काय प्रशासनाचे मत घ्यावे.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स. सभासद एकत्र येतात मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर	: मा.न्यायालयाचे आदेश चार मी. रस्ता करण्याचे आहे. डी.सी. रूल प्रमाणे सहा मीटरचा रस्ता पाहिजे. नेमके काय करायचे यावर विचारविनिमय करण्यासाठी सभा १५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.

(सभा दु.१२.४५ तहकूब पून्हा दु. २.१५ वा. सभेला सुरूवात. )

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर	: शूक्रवारी सभा ठेवू नये नमाजची वेळ असते.

मा.महापौर	: कालच ही बैठक आयोजित केली होती परंतू लग्नाचा कार्यक्रम असल्यामूळे आज घेण्यात आली. १८ तारखेला निवडणूक आहे. पदाधिकारी मा.आयुक्त यांना २० तारखेला दिल्लीला जाणार आहे. त्यामूळे आज बैठक घेण्यात आली.

श्री. संतोष खेडके	: विद्यानगरच्या संदर्भात काय निर्णय घेतलेला आहे या सभागृहात खूलासा व्हावा.

मा. महापौर	:या वर खूप चर्चा झालेली आहे. त्या भागात जे नागरीक राहतात त्यांना जा ये करण्यासाठी रस्ता नाही. तेथे चार मी. चा रस्ता करावा असे मा.न्यायालयाचे आदेश आहे. परंतु डी. सी. रूल प्रमाणे तेथे सहा मी.चा रस्ता असावा असे प्रशासनाचे मत आहे. विदयानगर व विजयानगर या दोन्ही लेआऊटमधील लोक एकमेकाकडे १० फुट जास्तीची जागा आहे असे सांगतात परंतू प्रशासनास असे आदेशीत करण्यात येते की उदया सकाळी ११.०० वा. परत एकदा मोजणी करून सविस्तर ठराव पूढच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठेवावा त्याप्रमाणे त्यास मंजूरी देण्यात येईल.

श्री.साहेबराव कावडे	:प्रत्येक महिण्याला सभा होती व विकास कामावर चर्चा होत नाही. विकास कामाच्या संदर्भात चर्चा करावी. सन २००५-०६ मधील विकास कामे झाली नाही तसेच २००६-७ च्या बजेटमधील सूध्दा कामास सूरूवात झालेली नाही. स्लम विभागा अंतर्गत असलेली कोणतेही कामे होत नाही. माझ्या वार्डातील जे काही कामे असतील ते ताबडतोब सुरू करण्यात यावे.१५दिवसापूर्वी माझ्या वार्डात एका कामाचे उद्घाटन केले अदयाप ते काम सुरू झालेले नाही.तसेच दोन पुलाचे काम सुरू केले ते सूध्दा पूर्ण झाले.काही नागरीकांची जाण्यायेण्यासाठी गैरसोय होते.

मा. महापौर	: शहर अभियंता यांनी या संदर्भात नोंद घ्यावी व संबधीत अधिकारी यांना चिकलठाणा भागातील जी जी कामे असतील ती करण्याचे आदेशीत करावे. नसता त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.साहेबराव कावडे	: श्री.सिकदंर अली यांना स्लम मध्ये काम करण्यास इंट्रेस नाही त्यांची बदली करण्यात यावी.

मा. महापौर	: कामे का केली नाही. संबधीत अधिकारी यांना उदया सकाळी १२.०० वा. माझ्या दालनात बोलवून विचारणा करण्यास येईल. स.सदस्य श्री.कावडे यांनी माझ्या दालनात याचे.

श्री.संतोष खेडके : माझ्या वार्डात स्पील ओव्हरची कामे होत नाही. तसेच नवीन कामे का झालेली नाही.

मा.महापौर : शहर अभियंता यांनी नोंद घेवून पूढील कार्यवाही करावी.

श्री.सिताराम सुरे : दोन तीन महिण्यापासून वेळोवेळी मी अतिक्रमणा संबधी प्रशासकीय अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले आहे. या विभागावर लाखो रूपये खर्च करतो परंतू या विभागाकडून कोणतीही कार्यवाही होत नाही हा विभाग असमर्थ ठरलेला आहे. माझ्या वार्डात अतिक्रमण सूरू आहे. त्यात दुसऱ्या वार्डातील नगरसेवक यांत हस्तक्षेप करून काही महानगरपालिकेचे काही ठेकेदार त्यात समाविष्ट आहे. आठ दिवसात अतिक्रमण काढले नाही तर मी महापालिका प्रवेशद्वार समोर उपोषण करील.याची नोंद घ्यावी.

श्री. संजय सिरसाट :आजच्या वृत्तपत्रात भूखंड संदर्भात आलेले आहे. दोन महिण्यापूर्वी अतिक्रमणाची मोहिम चालू होती.अतिक्रमणाची कार्यवाही करीत आहोत असे वृत्तपत्रात छापून आले. महानगरपालिकेची जवळपास २ कोटी किमतीची जागा आहे. ती जागा विकसीत करण्यासाठी व त्यातून नागरीकांना सुविधा मिळेल या दृष्टीने अर्थसंकल्पात २५ लक्षची तरतूद केलेली आहे. संरक्षित भित करण्यासाठी तेथील कामाचे टेंडर काढले अधिकाऱ्याना पत्र दिले परंतू असे सांगण्यात आले की तेथे फक्त लाकडाचे खोके ठोकून खोल्या काढलेल्या आहे. परंतू संबधीत व्यक्तीस लाईट कोठून दिली व तेथे समोर त्या व्यक्तीचे ट्रॅक्टर उभे आहे.पत्र दिल्यानंतर आदेशाचे पालन केले संबधीत व्यक्तीला अधिकारी जावून भेटले व स.सदस्यांचे पत्र आलेले आहे. जागा खाली करावी लागेल.नगरसेवकांनी अतिक्रमणाच्या संदर्भात पत्र दिल्यानंतर कोणतेही अतिक्रमण असो. नगरसेवकांचे नाव दाखवून अतिक्रमण पाडण्यास आलेलो आहोत असे सांगतात. त्या व्यक्तीने अधिकाऱ्या समोर मला मोबाईल लावला व माझे घर का पाडावयास लावता असे विचारू लागला. चार दिवसाची मूदत दया असे म्हटले. चार दिवसानंतर अधिकारी संबधीत व्यक्तीकडे गेले नाही. परंतू त्यास कोर्टात जाण्याचा सल्ला दिला व ताबडतोब स्टे मिळतो.सांगितले. परंतू संबधीत व्यक्तीची जागाच नाही म्हणून मी कोर्टात कशाच्या अधारे जावू असे त्या व्यक्तीचे मत झाले. जे लोक लीगल बांधकाम करतात त्यांचे साईटवर महापालिकेचे कर्मचारी आवश्य जातात परंतू ज्यांनी परवानगी घेतलेली नाही तेथे जात नाही. त्या व्यक्तीकडून २० हजार रूपये घेतले व नगरसेवकांचे काय असेल ते आम्ही पाहून घेवू असे त्यास सांगण्यात आले. कार्यालयात आले संचिका झाली.तेथील कामाचे टेंडर झाले मा.आयुक्तांनी मंजूरी दिली आणी प्रशासकीय अधिकारी विचारतात की हया जागेचे महानगरपालिकेच्या नावाचे पी आर कार्ड आहे का.कळवा म्हणून सिस्टीमच अशी आहे की संचिका वाटेल तेव्हा मालमत्ता विभागाकडून नगररचना विभागाला जाते. चार महिण्यापासून मालमत्ता अधिकारीच नाही. नगररचना विभागाकडे याची माहिती नसेल तर ते लिहतील की जो लेआऊट मंजूर झाला त्याची प्रत दयावी. . पून्हा यात काही लिगल आहे म्हणून विधी सल्लागारकडे ही संचिका पाठविली

जाईल प्रोसेस कशी लांबणीवर टाकायची हे अधिकारी करतात यात जे इमारत निरीक्षक आहे त्यांची दररोजची १० ते २० हजार रूपयाची कमाई आहे. हे मी खात्रीपूर्वक सांगतो.म्हणजे एखादया व्यक्तीने अतिक्रमण केले त्याचे पाठलागही केला तरी सहा महिने ते अतिक्रमण काढलेच जात नाही. असे किती भूखंड आहे. विवेकानंद कॉलेजच्या बाजूची ५२ हजार स्क्वेअर मीटर जागा आहे त्याचे मनपाच्या नावाने पीआर कार्ड आहे काय? अनेक जागेचे पीआर कार्डच महानगरपालिकेकडे नाही.अतिक्रमण होण्यास अधिकारी प्रोत्साहन देत असेल तर त्यांचे कडून तात्काळ चार्ज काढावा. एका ठिकाणी साहेब येत आहे मालक कोण आहे खाली बोलवावे म्हणून अधिकारी म्हणतात व रिव्हॉल्वर दाखवतात. जेणे करून मालक घाबरून गेला पाहिजे. केसरसिंगपूरा येथे एक कोटीची जागा आहे मागे सूध्दा बोललो होतो. त्या व्यक्तीकडून पैसे घेतले व पावसाळयात अतिक्रमण पाडता येत नाही म्हणून स्थायी समितीमध्ये खूलासा केला असे सांगण्यात आले. तेथील टपरी धारकाकडून पैसे घेतात व बाजूचेच अतिक्रमण हटविले जात नाही. या पूर्वी एका इमारत निरीक्षकांच्या संचिकेवर तत्कालीन आयुक्त यांनी श्री. संगेवार यांना पून्हा या विभागात कधीच घेवू नये म्हणून लिहिले होते तरीही तो कर्मचारी पून्हा प्रशासकीय विभागालाच काम करतो. प्रशासकीय विभागातून त्याची बदली करावी तसेच श्री.राजपूत व श्री.संगेवार यांचीही तात्काळ या विभागातून बदली करण्यात यावी. वेंदान्तनगर मधील ओपन स्पेसच्या जागेवर जे अतिक्रमण आहे ते ताबडतोब हटविण्याचे आदेशीत करावे.

श्री. संजय जोशी :मा.आयुक्त तसेच कार्य.अभियंता यांचे मंजूरीने त्या जागेवर संरक्षित भिंत करण्याचे कामाचे टेंडर काढले जाते. असे असतांना ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे का असे लिहिण्याचे अधिकार प्रशासकीय अधिकारी यांना आहे का?

सौ.मेहरून्नीसा खॉन : माझ्या वार्डात चार ओपनस्पेस आहेत त्या ठिकाणी मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले असून बांधकाम चालू आहे प्रशासनास पत्र ही दिले कार्यवाही होत नाही.

श्री.गजानन बारवाल : बी अॅण्ड सी ऑफिसच्या बाजूला महानगरपालिकेची ओपनस्पेस आहे. तेथे अतिक्रमण झालेले असून एक ही टपरी आतापर्यत काढलेली नाही.

श्रीमती रजनी जोशी : सिडको महापालिकेकडे हस्तांतरण झाले. टी. व्ही. सेन्टर चौंकात मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. पत्र ही दिले कार्यवाही होत नाही तेथील मूख्या रस्त्यालगत मोठया प्रमाणात हातगाडया उभ्या असतात.ते त्वरीत हटविण्यात यावे. महानगरपालिकेत सिडको आले म्हणून आता कार्यवाही होत नाही अशी भावना लोकांची झालेली आहे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :ं शांतीपूरा भागात महानगरपालिकेच्या एका ओपनस्पेसवर एक टपरी आहे. त्या टपरीमध्ये रात्र दिवस लोक पत्ते खेळतात. काही ठिकाणी तर महापालिकेची जागा लोकांनी विक्री केली तेथे घर बांधले. या संदर्भात मी पत्र दिले कूणीही अधिकारी तेथे आले नाही. नंतर छावणीचे अधिकारी यांना बोलवून सर्व माहिती दिली. त्यांनी तेथील सर्व सामान घेवून गेले. एवढी वाईट परीस्थिती निर्माण झाली होती.

सौ. कला बोरामणीकर : निरालाबाजार येथील मूख्य रस्त्यावर दगडाच्या राशी येवून पडलेल्या आहे. या संदर्भात मी वारंवार सांगितले परंतू एकही दगड काढला नाही. ये जा करणाऱ्या वाहनांना त्रास आहे तसेच त्या खालून महानगरपालिकेची जलवाहिनी सूध्दा जाते.प्रशासकीय विभाग अतिक्रमण हटविण्यास नाकाम झालेले असून तसेच वरद गणेश मंदीरच्या बाजूला मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे ते हटविण्यात यावे.

श्री.संतोष खेंडके :सर्वच स.सदस्यांनी पोटतिडकीने सूचना माडंल्या आहेत. खालचा कर्मचारी वर्ग डायरेक्ट साईटवर जातात. पैसे घेतात.त्यामूळे मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे. त्यासाठी ज्यांना या विभागात १० -१५ वर्षापासून काम करतात त्याची बदली करावी. दोन तीन महिण्यासाठी दुसऱ्या विभागात बदली होते पून्हा प्रशासकीय विभागात त्यांना दिले जाते.

श्री.रेणुकादास वैद्य : इमारत निरीक्षक हे बऱ्याच दिवसापासून प्रशासकीय विभागातच काम करतात जी सिस्टम चालू आहे ती बंद होण्याची गरज आहे.या सर्वांची कार्यक्षम असलेल्या पाणीपूरवठा सारख्या विभागात त्याची बदली करावी.

श्री.मधुकर सावंत : बाबा हरीदास नगर मध्ये महानगरपालिकेची दोन तीन कोटीची ओपनस्पेस आहे पी.आर कार्ड असतांना त्या जागेत मोठे अतिक्रमण केले या संदर्भात स्थायी समितीमध्ये मुद्या उपस्थित केला होता. परंतू अतिक्रमण विभागाने याकडे लक्ष दिले नाही. संबधीत नागरीकांना नोटीसेस दिल्या पूढे कार्यवाही केली नाही.

श्री.अ.रशिद खान : १९८४ ला मा.जिल्हाधिकारी यांनी ४५ एकर जागा महानगरपालिकेच्या नावावर केली तेथे एका व्यक्तीने दोन एकर जागा स्वत: च्या नावावर करून घेतली. शिवाय विटभट्टी ही चालू आहे तसेच आणखी २० ते २५ विटभट्टया अनाधिकृत आहे जमिन महानगरपालिकेची फायदा काहीही नाही जोपर्यत पोलीसात गुन्हा दाखल करीत नाही तोपर्यत हे बंद होणार नाही.तसेच घाटी गेट समोरील रस्त्याच्या फुटपॉथवरील अतिक्रमण हटविण्यात आले होते आता पून्हा झाले काही लोक झोपडी करून फुटपॉथवरच घाण करीत आहे.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :एन ७ मध्ये मनपाच्या कार्यालयाच्या शेजारी मोठया प्रमाणात टपऱ्या आहे.जेथील अतिक्रमण काढले तेथे पुन्हा येवून लोक वास्तव्य करीत आहे. गरीबाचे अगोदर न काढता जे श्रीमंत आहे त्यांचे काढावे महानगरपालिकेच्या मालकीची जागा कोठे कोठे आहे व किती जागेचा ताबा महापालिकेकडे आहे याची माहिती घेण्या बाबत आदेशीत करावे. महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमण अगोदर काढावे जागा ताब्यात घ्याव्या त्यानंतर इतर मध्यम व रोडवरील अतिक्रमण काढावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्याही जागा आहे त्यांचे अभिलेख महापालिकेकडे आहे का सन ९३-९४ मध्ये या संदर्भात रेकॉर्ड तयार करण्यात आले होते. त्यानंतर कुठलही रेकॉर्ड केला नाही. जे रेकॉर्डवर जागा होत्या त्यावर मोठे अतिक्रमण झाले. ते हटविण्याची कार्यवाही केली नाही.जेथे महानगरपालिकेच्या मालकीची जागा असेल त्याचे रेकॉर्ड तयार करण्या बाबत आदेशीत करावे.

श्री.भगवान घडमोडे : जाफरगेट येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या जागेत एका व्यक्तीने अतिक्रमण केले. त्या ठिकाणी संबधीत अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी केली तरी कार्यवाही केली नाही. शहरात गुंठेवारी कायदा लागू केलेला आहे. २०×३० च्या प्लॉटला बंदी आहे असे असतांना शहरात सर्रासपणे प्लॉटींग चालू आहे ते बंद होण्याची गरज आहे.नसता मोठया समस्याला सामोरे जावे लागेल.

श्री.शंशाक विसपूते : जेथे नॅचरल स्लोप व रस्ता म्हणून वापर होतो तेथे सूध्दा प्लॉटींग केली जात आहे. ते बंद झाले पाहिजेत.

सौ. विजया रहाटकर : ज्योतीनगर भागात एक लेआऊट आहे या लेआऊटमध्ये महानगरपालिकेची ओपनस्पेस आहे तेथे मनपाने हॉल असून दोन रूमचे बांधकाम आहे एका रूममध्ये एका व्यक्तीने अनेक दिवसापासून अतिक्रमण केले आहे त्या संबधी कार्यवाही केली जात नाही. या बाबतीत कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

मा. महापौर :आतापर्यत १७ नगरसेवकांनी आपआपल्या भागातील अतिक्रमणाच्या संदर्भात तक्रारी केलेल्या आहेत. यापैकी १४ नगरसेवकांनी म्हटले की महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण होत आहे. प्रशासकीय अधिकारी इमारत निरीक्षक यांचे याकडे लक्ष नाही. असे सर्व सभागृहाचे मत झालेले आहे. तसेच फुटपॉथ वर असेल किंवा टी. व्ही. सेंन्टर चौकत मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे ते तात्काळ काढण्याची गरज आहे स. सदस्य श्री. सुरे यांनी त्यांचे वार्डातील मयूरनगर भागात मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे या बाबतीत प्रशासकीय अधिकारी यांनी खूलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : स. सदस्य श्री. सुरे सिताराम यांनी सूचना केल्या प्रमाणे एसबीओ शाळे समोरील टपऱ्या हटविण्यात आल्या होत्या

श्री.सिताराम सूरे : एक ही टपरी हटविलेली नाही. टेलिफोन कार्यालयासमोरील टपरी हटविली तो स. सदस्य श्री.ताठे यांचा वार्ड येतो. माझ्या वार्डात अनधिकृत बाधंकाम मोठया प्रमाणात होत आहे ते का बंद केले जात नाही. अधिकारी तेथे सूविधा पूरविणार आहे का.महानगरपालिकेच्या १५ मीटर रस्त्यावर मोठमोठी अतिक्रमणे झाली त्या संबधी कार्यवाही केली जात नाही.

मा. महापौर : इमारत निरीक्षक या भागात कोण आहे.त्यांना या संबधीची माहिती नाही का

प्रशासकीय अधि. : श्री.जोशी हे इमारत निरीक्षक आहे. तेथे पाहणी केलेली आहे. रस्त्यावर हातगाडया होत्या त्या हटविल्या होत्या पून्हा असतील तर कार्यवाही करण्यात येईल.

मा.महापौर : आताच स.सदस्य यांनी वेगवेगळया ठिकाणचे अतिक्रमणा बाबत मूद्ये मांडले त्या संबधी कार्यवाही का केली जात नाही.

प्रशासकीय अधि. : शहर लहान असतांना १५ इमारत निरीक्षक होते आता ७ इमारत निरीक्षक आहे.

श्री.मोहन मेघावाले : टी.व्ही. सेन्टर चौक व सिडको हडको भागात मोठया प्रमाणात रस्त्यावर अतिक्रमण केलेले आहे. काही लोक तेथे हप्ते वसूल करतात. वारंवार बैठकीमधये तसेच प्रशासकीय अधिकारी यांना कळवूनही कार्यवाही केली जात नाही. याचे कारण काय?

प्रशासकीय अधिकारी : वेंदातनगरच्या खूल्या जागेवर मी स्वत: पाहणी केली. तेथे जूने ट्रॅक्टर तसेच बांधकामाचे साहित्य पडलेले होते. तीन चार झोपडया कच्चे शेड टाकून होत्या मी सूचना दिल्यानंतर वरील सर्व संबधीत व्यक्तीने काढून घेतले आता सध्या एकच शेड उभे आहे व त्या भागातील एक नागरीक किंवा वॉचमन तेथे रहात आहे. दोन तीन दिवसाची मूदत दिली आहे सर्वच काढून घेतले नाही तर या विभागाकडून कार्यवाही केली जाईल.

श्री.संजय सिरसाट :तेथे एकच व्यक्ती होते दोन तीन शेड होते.कोणत्या व्यक्ती तेथून निघालेला आहे त्यांचे नाव सागांवे. आपले अधिकारी तेथे गेले होते त्या व्यक्तीने दोन तीन फळया काढल्या मी जे स्टेटमेंन्ट केले ते चूकीचे असेल तर कबूल करावे. अतिक्रमण काढण्यासाठी आपले अधिकारी गेले कार पेन्टरचा मला दुरध्वनी आला दोन तीन दिवसात काढतो म्हणून सांगितले होते. पत्र देवून दीड महिणा झाला अदयाप अतिक्रमण काढले नाही.

मा. आयुक्त : :संबधीत अधिकारी यांना आदेशीत करतो की त्यांनी उदया सकाळी ११ वाजेपर्यत वेदांन्तनगर भागातील अतिक्रमण काढावे.

श्री.सजंय सिरसाट : मी पैसे घेतल्याचा आरोप केलेला आहे.संबधीताची ताबडतोब बदली करावी. वाईट वाटून घेवू नये परंतू या विभागातील इमारत निरीक्षक याची रोज बैठक होते व कूणी किती रक्कम जमा केली त्यांचे सध्याकाळी जलतरण तलावावर वाटप होते.या जागेवर संरक्षित भिंत बाधण्याचे टेडर काढले होते. मी विचारणा केली असता संचिका सादर केली असे म्हटले होते कोणती संचिका सादर केली होती खूलासा घेण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी : स.सदस्य श्री.शिरसाट संजय यांनी वेदांतनगर येथील खूल्या जागेच्या संदर्भात एक पत्र दिले होते. त्याचा खूलासा सादर केलेला आहे. या भागात विधाते नावाचे इमारत निरीक्षक आहे. ते सात आठ वर्षापासून त्याच भागात आहे. आताच मा. आयुक्तानी आदेशीत केल्यानुसार उदया सकाळी ११.०० वाजता सदर अतिक्रमण पाडण्यात येईल.

श्री. संजय सिरसाट : विचारणा केली असता मालमत्ता विभागाकडे संचिका पाठवली असे सांगण्यात आले होते कोणती संचिका आहे खूलासा करावा.

प्रशासकीय अधि. : या संदर्भात कोणतीही संचिका तयार झालेली नाही. इमारत निरीक्षक मला म्हटले होते त्यानूसार मी स.सदस्य यांना बोललो होतो.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : स. सदस्य यांनी दीड महिण्यापूर्वी पत्र दिले कार्यवाही केली नाही.

मा. आयुक्त : जेजे अतिक्रमणाच्या संदर्भात स. सदस्यांनी मत मांडले ते ते अतिक्रमण का काढले नाही यांची माहिती घेण्यात येईल. वेदांत नगर येथील अतिक्रमण का काढण्यात आले नाही. दीड महिण्यापूर्वी पत्र देवूनही कार्यवाही का केली नाही उशीर का लागलेला आहे उपआयुक्त यांचेकडून चौकशी करून घेतली जाईल व जो दोषी असेल त्यांचेवर प्रशासकीय कार्यवाही केली जाईल. ज्या ज्या अतिक्रमणाच्या संदर्भात तक्रारी मांडलेल्या आहे त्याची नोंद घेतलेली असून

कार्यवाही करण्यात येईल व उदया सकाळी ११.०० वाजता वेंदान्तनगर भागातील मोकळया जागेवरील अतिक्रमण काढण्यात येईल.

मा. महापौर : उदया सकाळी ११ वाजता वेदांन्तनगर भागातील मोकळया जागेवरील अतिक्रमण हटविण्यात यावे तसेच ज्या ज्या भागातील अतिक्रमणाच्या संदर्भात सूचना मांडलेली आहे त्यासंबधी प्रशासनाने कार्यवाही करावी तसेच ज्या ज्या इमारत निरीक्षक यांना प्रशासकीय विभागात तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असेल किंवा वारंवार त्या विभागात येत असतील त्यांची त्वरीत या विभागातून बदली करण्यात यावी.आताच मा. आयुक्त यांनी म्हटल्या प्रमाणे उपआयुक्त हे चौक्शी करतील व जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही होईल .१७ स. सदस्यांनी अतिक्रमणाच्या बाबतीत तक्रारी दिलेल्या आहे. त्या शिवाय ज्या ज्या अतिक्रमणाच्या संदर्भात तक्रारी येतील.याकडे प्रशासकीय विभागाने विशेष लक्ष देवून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी.

श्री.सतीश कटकटे : गौतमनगर भागात १० लक्ष खर्च करून समाजमंदीर बांधत आहोत. मा. आयुक्तांनी मंजूरी ही दिली परंतू सदरची जागा माझी आहे असे म्हणून एका व्यक्तीने न्यायालयाचे स्थगिती आदेश आणले. ते काम सध्या बंद आहे.

श्री. भगवान घडमोडे : अतिक्रमणा संदर्भात बऱ्याच वेळापासून चर्चा चालू आहे.प्रशासकीय अधिकारी यांचे बदलीची मागणी यापूर्वी सभागृहात झालेली आहे.इमारत निरीक्षकाच्या बदल्या झाल्या परंतू या विभागाची सुधारणा झाली असे वाटत नाही. कितीही बदली केली तरी उपयोग नाही परंतू या विभागाची यंत्रणा सूधारली पाहिजे.

श्री.संजय सिरसाट : दिनांक २७.१०.२००६ च्या बैठकीत तत्कालीन महापौर यांनी प्रशासकीय अधिकारी यांची बदली करण्याचे आदेशीत केले होते कार्यवाही केली नाही.

श्री.भगवान घडमोडे :अधिकाऱ्यावर जबाबदारी फिक्स करावी. नगरसेवकांवर कार्यवाही होते. अधिकाऱ्यावर का होत नाही.

श्री.मोहन मेघावाले : ज्यां अतिक्रमण संदर्भात बोललो त्यांना अधिकारी कर्मचारी दुरध्वनीवरून माहिती देतात हे बंद झाले पाहिजे यात सुधारणा करावी.

श्री.सलीम खान : अतिक्रमणाच्या संदर्भात नगरसेवक बोलले तर कार्यवाही होते. जर अधिकारी महानगरपालिकेच्या जागा हस्तगत करून घर तयार करीत असेल तर त्याचेवरही कार्यवाही झाली पाहिजे.

मा.महापौर : महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण होवू नये म्हणून त्यासाठी काही रूल आहे. जसे नगरसेवकांवर कार्यवाही होते. या संदर्भात मा. आयुक्त खुलासा करीतील. यापूढे ज्या भागात अतिक्रमण होईल त्या भागातील इमारत निरीक्षक आणि वार्ड अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

श्री.संजय सिरसाट : जर एखादया अतिक्रमणास नगरसेवक प्रोत्साहन देत असेल तर त्यांचे नगरसेवक पद रद्य होते. तसेच अधिकारी यांनी सुध्दा प्रोत्साहन दिले तर त्यांचेवर पोलीसात गुन्हा नोंद होवू शकतो तसेच संबधीत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचेवरही कार्यवाही होवू शकते.डहाळे प्रकरणाच्या संदर्भात दोन दिवसापासून वृत्तपत्रात येत आहे त्यांचा खूलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : दि.१३.१०.२००६ च्या बैठकीत विषय क्र ५२५ हा आरक्षण क्र २२९ च्या संदर्भात आहे.ठराव मंजूर केला त्यावेळी सभागृहात या जागेवर कोणतीही बांधकाम परवानगी दिलेली नाही.असा खूलासा सभागृहात केला होता.त्या सभेचे इतिवृत्त कायम झाले सदर भूखंडावर मोठे बांधकाम चालू आहे.वादाचे प्रस्ताव मंजूर करून घेतले जाते परंतू विकास काम करण्याचे ठरावाच्या बाबतीत दुर्लक्ष केले जाते. व्यापारी संकुलनाचे बांधकाम सुरू महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे आदेश कचऱ्याच्या टोपलीत असे वृत्तपत्रात आले यामूळे महानगरपालिकेची बदनामी होते.जो ठराव सर्वसाधारण सभेने मंजूर केला तो मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविलेला आहे का पाठवला असेल तर दिनांक व जावक नंबर दयावा.

डॉ. आशा बिनवडे : जे २२९ क्रमांकाचे आरक्षण होते ते जिल्हा उपकेंद्रासाठी होते. या संदर्भात नगररचना विभाग मा. आयुक्तांकडे पत्रव्यवहार करून तेथे जिल्हा उपकेंद्र विकसीत करावे अशी विनंती केलेली होती. ते विकसीत तर केले नाही व भूसंपादनासाठी खर्च करू शकत नाही म्हणून ती जागा एका बिल्डरास विकसीत करण्यासाठी देत आहोत असे उत्तर मिळाले. ७ ऑक्टोंबरला संबधीत बिल्डरला परवानगी देण्यात आली त्यानंतरच्या बैठकीत संबधीत अधिकारी यांनी तेथे परवानगी दिली नाही असा खूलासा केला होता. जनतेला विविध सेवा एकत्रित मिळाव्या यासाठी हे आरक्षण होते. यात सांस्कृतिक सभागृह ,कल्याण केंद्र जिम्न्याशियम,आर्ट गॅलरी ,वस्तु संगृहालय,वाचनालय,क्लब हाऊस बाल भवन वाहन तळ सह रिक्षा टॅक्सीसह शहर बस स्थळ नाटयगृह नगर पालिकेची विविध कार्यालय ,दुरध्वनी कार्यालय. पोलीस चौकी, डाक कार्यालय, बांधकाम ई. बाबीसाठी हया आरक्षणाचा उपयोग होणे आवश्यक होते. जनहितासाठी आरक्षीत असलेल्या जागेचा उपयोग करतांना लोकांसाठी कोणत्या सुविधा देणे आवश्यक आहे यावर मत घेण्यासाठी या सभागृहासमोर प्रशासनाने यायला पाहिजे होते. त्यावर सभागृहाचा विचार विनिमय घेवून निर्णय घ्यायला पाहिजे होता ते सर्व डावलून परस्पर मा. आयुक्तानी आपल्या अधिकारात ही परवानगी दिली ती स्थगित करावी. जोपर्यत या सभागृहात निर्णय होत नाही तोपर्यत अशी परवानगी देवू नये.

श्री..संजय सिरसाट : डहाळे प्रकरणाच्या बाबतीत दोन तीन दिवसापासून वृत्तपत्रात छापून येत आहे त्या बाबतीत खूलासा करण्यात यावा.

म्रा. महापौर : मा. आयुक्त यांनी या संदर्भात सविस्तर खूलासा करावा.

मा. आयुक्त : १९८१ ला महसूल विभागाने महानगरपालिकेला ४५ एकर जागा देण्याचा निर्णय घेतलेला होता. त्यानंतर १९९४ मध्ये तलाठी सज्जा हर्सूल यांनी या जागेचा ताबा महानगरपालिकेकडे दिला.आतापर्यत सातबारा वर महानगरपालिकेचे नाव नाही. १७ जानेवारी २००५ रोजी.स्थायी समितीने एक रिझर्वेशन द्वारा एक पहाडसिंगपूरा येथील जलकुभांची एक जागा ताब्यात घेतली व त्या जागेच्या मोबदल्यात ही जागा देण्यात आली. नागपूरला जाण्यापूर्वी ही संचिका मी बघीतली होती. यामध्ये असे दिसून येते की ७,२८० चौ.मी. ही जागा महानगरपालिकेने

पहाडसींगपूरा येथे घेतली त्याची किमत ३४ लक्ष असी काही तरी होते. त्या ऐवजी ही जागा संबधीतास हर्सूल मध्ये दिली असा स्थायी समितीने ठराव घेतला हा प्रशासकीय ठराव होता. त्या संचिकेमध्ये सहा. संचालक नगररचना यांची स्पष्ट नोटींग दिसली की ३४ लक्षची जागेची किमत आहे तितक्या किमतीची जागा त्याना हर्सूल येथे देण्यास हरकत नाही. त्यांना जी जागा देण्यात आली ती तितक्या क्षेत्राची दिली त्याची किंमत त्यावेळी ४८ ते ४९ लक्षची होती. याचा अर्थ संबधीत व्यक्तीस १५ लक्षकिमतीची जागा जास्त देण्यात आली असे दिसते. अशा प्रकरणात खोलपर्यत जात नाही त्याशिवाय पूर्ण माहिती समोर येणार नाही.त्यामूळे जानेवारी २००५ चे व्हॅल्य या जमीनीचे किती होते ते काढण्यास सांगितले आणि निश्चीत किती जागा दयायला पाहिजे होती त्यापैकी किती दिली जास्त दिली असेल व दिली कशी त्याची रजिस्ट्री झालेली आहे. त्यांचे नावावर जागा दिलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच या जागेवर ज्या काही विटभट्टया आहे.या जागेवर एकूण आठ ते नऊ विटभट्टया दिसून येतात. ही जागा एलो झोन मध्ये आहे या जागेत विटभट्ठी चालविता येत नाही. संबधीतानी महानगरपालिकेची एनओसी घेतली नाही. या संदर्भात दोन चार दिवसात चौकशी करून घेवू शिवाय जेथे एलो झोन आहे ती जागा स्वत: च्या मालकीची असली तरी विटभट्टी चालविता येत नाही.जर चालवायची असेल तर महापालिकेची एनओसी लागते. त्या जागेवर जे काही विटभट्टया आहे त्या अनाधिकृत असून जे काही अतिक्रमण झालेले आहे ते काढावे असे आदेशीत केले होते. काल या संदर्भात कार्यवाही केलेली आहे. या पेक्षा जास्तीची योग्य माहिती नंतर देण्यात येईल. दुसरे असे की स. सदस्या डॉ. बिनवडे आशा यांनी मुद्या मांडल्यानूसार सदर जागेवर भाजी मंडई किंवा लहान लहान व्यापाऱ्यासाठी गाळे काढावे असे त्यांनी पत्र दिले होते. या संदर्भात प्रशासनाकडे असा प्रस्ताव आला की संबधीत व्यक्तीने १५ ते २० टक्के बांधकाम करून महापालिकेला दयायचे बाकीचे संबधीतानी ज्या कामासाठी आरक्षण आहे त्यामध्ये जो काही अनुज्ञेय वापर आहे त्या वापरासाठी बांधकाम करावे. तो प्रस्ताव लिगली होत असल्यामूळे व महापालिकेला जागा मिळत असल्यामूळे व शॉपींग कॉम्प्लेक्सचे निकष लावून २५ टक्के एक्स्ट्राचे करण्याचे जाण्याच्या पूर्वी मी ती संचिका क्लीअर करून दिली होती.माझ्या सहीच्या नंतर सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर आदेश निर्गमित झाले की अगोदर झाले. या बाबत सहा. संचालक नगररचना सांगतिल. त्या जागेची किमंत ही जवळपास चार ते पाच कोटीच्या आसपास आहे ते विकत घेवून विकास करणे एवढे बजेट महापालिकेकडे नाही. परंतू ज्या कामासाठी त्या जागेचा वापर होतो त्यासाठी मान्य केले.जपानहून आल्यानंतर असे कळले की ही जागा विकत घेवून विकास करण्याचा निर्णय सर्वसाधारण सभेने मंजूर केले.

श्री.प्रशांत देसरडा : हे मंजूर करण्याचे अधिकार आयुक्तांना नाही. यापूर्वी जयटावर्स, मालखरे,तसेच बन्सीलालनगर भागात श्री.अग्रवाल यांना परवानगी दिली हया सर्व परवानगी

सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने दिलेल्या आहे. हे अधिकार सर्वसाधारण सभेचे असतांना आयुक्तांनी मंजूरी देणे योग्य नाही.

सहा.संचालक न.र. : मुं.प्रा.न.र अधिनियम १९६६ चे कलम १५२ नूसार हे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे. यातील कलम ४४,४५ चे परवानगीचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यात आलेले आहे.डेव्हलपमेंन्ट कन्ट्रोल रूलस् जे तयार करण्यात आले त्या अंतर्गत अकॉमेडेशन रिझर्वेशन सुध्दा कन्ट्रोल रूल मध्येच येते. हे रूल जेंव्हा शासनाकडून मंजूर झाले नव्हते त्यापूर्वी सर्वसाधारण सभेसमोर ते प्रस्ताव आणलेले होते. आता मा. आयुक्तांना अधिकार दिलेले आहे. मा. आयुक्तांनी ७.१०.०६ रोजी मान्यता दिली त्यानंतर १३.१०.२००६ ला सर्वसाधारण सभा झालेली होती. तेंव्हा ती परवानगी निर्गमित करण्यात आलेली नव्हती. त्यामूळे परवानगी देण्यात आलेली नाही असा खूलासा केला होता. जो पर्यत मा. आयुक्त अशा परवानगी थांबविण्याचे जोपर्यत आदेश देत नाही तोपर्यत ते थांबविण्याचे अधिकार मला नाही. म्हणून ती बांधकाम परवानगी निर्गमित केलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा : या जागेवर बांधकाम परवानगी दिली नाही त्यानंतर या सभागृहाने ठराव घेतला की ही जागा महापालिकेने घेवून विकसीत करावी. प्रशासनापेक्षा हे सभागृह सर्वश्रेष्ठ आहे हे विसरता येणार नाही. या सभागृहाने ठराव मंजूर केला व सदर जागेवरील बांधकाम परवानगीची प्रत देणे बाकी होते अमुक ठराव सभागृहाने या संदर्भात घेतलेला आहे हे मा. आयुक्तांना कळवायला पाहिजे होते स्थगित ठेवण्याचे आदेश दिले असते. हा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविलेला आहे काय याचा खूलासा करावा.सभागृहाने जो ठराव पास केला त्यास दोन महिने झाले त्यावर काय कार्यवाही केली आहे.

श्री.संजय सिरसाट : यानंतर सभागृह नेता यांनी ऐनवेळी ठराव दिला व ही जागा भूसंपादीत करावी किंवा ७५-२५ प्रमाणे दयावे दुसऱ्या बैठकीला तो कायम करण्यासाठी आला त्यावेळी सभागृह नेता यांनी असे म्हटले होते की जे महापालिकेच्या हिताचे आहे तो निर्णय आयुक्तांनी घ्यावे.

श्री. देसरडा प्रशांत : ठरावामध्ये कूठेही दुरूस्ती केलेली नाही. इतिवृत्तात पहावे इतिवृत्तात काना मात्रा विलाटी ही दुरूस्ती करता येते मागिल ठराव पास झालेले त्यात बदल करण्याचे अधिकार नसून तीन महिण्यानंतर बदलण्याचा अधिकार आहे.

श्री.अ.रशिद खान : ऐनवेळी ठराव घेतले जातात. चर्चा होत नाही त्यामूळे असे प्रश्न उपस्थित होतो. ते इतिवृत्त कायम झाले आता काय निर्णय घेवू शकतो.

मा.महापौर : या जागेवर मा.आयुक्त यांनी ७ तारखेला बांधकाम परवानगी दिली. १३ तारखेच्या बैठकीत सदरील जागा महापालिकेने विकत घेवून विकसीत करावी असा ठराव पारीत झाला

श्री.किशनचंद तणवानी : ठराव क्र ५२५ च्या संदर्भात सदरील जागेवर परवानगी दिली नाही असा खूलासा नगररचना अधिकारी यांनी दिल्यामूळे ती जागा महापालिकेने घेवून विकसीत करावी म्हणून ठराव घेतला.

सौ. विजया रहाटकर : १५२ रूल काय आहे खूलासा करावा.

श्री.देसरडा प्रशांत : ती जागा महानगरपालिकेने विकसीत केली तर भाजीमंडई,कम्यूनिटी हॉल दुकाने होतील.

श्री.संजय सिरसाट : जो ठराव मंजूर केला त्यात हे सर्व आहे का एकीकडे महानगरपालिकेची असलेली महापौर बंगल्याजवळील,वसंतभुवनची शहानूरवाडी येथील जागा बीओटीवर देत आहोत व ही जागा विकत घेत आहोत हे बरोबर वाटत नाही.

सहा. संचालक (न.र.) : १५२ हे डेलीगेशन ऑफ पावर बद्दलचे कलम आहे.

मा. महापौर : मराठी भाषेतून सर्व सदस्यांना याची प्रत देण्यात यावी.

श्री. देसरडा प्रशांत : या कलमा च्या बाबतीत सर्वांना माहिती व्हावे हे ठिक आहे परंतू संबधीत एखादया जमिन मालकाने नोटीस दिली तर आम्ही ठराव पास केला की ती जागा भूसंपादीत करावी. सर्वसाधारण सभेने ठराव पास केल्यानंतर परवानगीची प्रत संबधीतास दिली त्यामूळे ती परवानगी रद्द करावी. व महानगरपालिकेने ती जागा भूसंपादीत करून विकसीत करावी.

श्री.किशनचंद तणवाणी : विषय क्र ५२५ च्या संदर्भात जेंव्हा या सभागृहाने ठराव मंजूर केला तेंव्हा प्रशासनाने बांधकाम परवानगी दिलेली नाही असा खूलासा झाला होता. ठराव मंजूर झाल्यानंतर बांधकाम परवानगी दिली. याचा अर्थ प्रशासनाने सभागृहाची दिशाभूल केली काय ?

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :सभागृहाने ठराव घेतल्यानंतर त्याची माहिती संबधीत अधिकारी यांनी वरीष्ठ अधिकारी यांना दिलेली होती काय जेंव्हा लहान मोठे ठराव होतात शासनाकडे पाठविले जातात त्यास शासनाने मंजूरी दिलेली होती काय याचाही खूलासा करावा.

सहा. संचालक(न.र.) : कलम १५२ नूसार परवानगी देण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहे. सात तारखेला मा. आयुक्तांनी मंजूरी दिली त्यानंतर सर्वसाधारण सभा झाली. त्यावेळी संबधीतास परवानगीची प्रत दिली नव्हती त्यानंतर देण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त : या संबधीची संचिका ७ तारखेला माझ्याकडे आली त्यास मंजूरी दिली आठ तारखेला जपानला गेलो त्यानंतर १३ तारखेच्या सर्वसाधारण सभेत अशासकीय ठराव घेवून ही जागा महानगरपालिकेने भूसंपादीत करून विकसीत करावी असा निर्णय घेतला. त्यावेळी इमारत बांधकाम परवानगी निर्गमित झालेली नव्हती. त्यामूळे संबधीत अधिकारी यांनी तसा खूलासा केला होता. परवानगी दिली नाही हे बोलणे टेक्नीकली झाले परंतू परवानगीचे आदेश निर्गमित केले नाही असा खूलासा करायला पाहिजे होता.

श्री. प्रशांत देसरडा : अशासकीय ठराव प्रशासनाकडून खूलासा घेवून मंजूर केलेला होता. परवानगी दिली नाही म्हणून तसा ठराव घेतलेला होता. त्यानंतर परवानगीची प्रत दिली.

श्री.किशनचंद तणवानी : त्या ठरावाचे इतिवृत्त कायम झाले. परत तो ठराव या सभागृहासमोर आणावा. हा प्रस्ताव रद्द करावा.

डॉ. आशा बिनवडे : सेक्शन १९० वाचले तर लक्षात येईल की जर एखादया जागेच्या संदर्भात सर्वसाधारण सभेने ठराव पास केला असेल तर परवानगी निर्गमीत केली तर ती

नाकारण्याचे अधिकार आहे. ती परवानगी नाकारून या सभागृहासमोर पून्हा प्रस्ताव ठेवू शकतो. त्यानंतरच त्यास परवानगी दयावी.

श्री. प्रशांत देसरडा : परवानगी रद्द करावी सर्वसाधारण सभेने घेतलेल्या ठरावाची अमलबजावणी करावी.बन्सीलाल नगर मध्ये श्री. अग्रवाल यांना बांधकाम परवानगी दिली होती सर्वसारण सभेनेच स्थगिती दिली होती. तो अधिकार सभागृहाला आहे.

श्री.संतोष खेंडके : २२५ ठरावा संदर्भात मी सूचना केली होती की ७५/२५ प्रमाणे विकसीत करावे. महानगरपालिकेची परीस्थिती बरोबर नसल्याने नंतरही आपण विकसीत करण्यासच देणार आहोत.

मा. आयुक्त : प्रशासनाच्या अधिकारात संबधीतास इमारत बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्यानंतर सर्वसाधारण सभेने ठराव घेवून ही जागा महापालिकेने विकसीत करावी असा निर्णय घेतला. याबाबतीत लिगली तपासणी करून कार्यवाही करू. टेक्नीकली स्थगित करण्याचे अधिकार प्रशासनास नसते. लिगली ७ दिवसात तपासणी करून पूढील सभेत त्याची माहिती देण्यात येईल.

श्री.संजय सिरसाट : ऐनवेळीचा प्रस्ताव मी देत आहे शहानूरवाडी येथील छोबीघाटची जागा बीओटीवर देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आठ महिणे झाले आजपर्यत करारनामा केला नाही. ती जागा महत्वाची आहे ती परवानगी सूध्दा रद्द करावी व सदर जागा महानगरपालिकेच्या खर्चाने विकसीत करावी.असा ठराव मंजूर करावा ही विनंती.

मा. महापौर : या बाबतीत मा. आयुक्त माहिती घेवून त्यानंतर त्या बाबतीत निर्णय घेता येईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : ऐनवेळचे ठराव घेवू नये. अमलबजावणी होत नाही. माजी महापौर यांनी एक ठराव घेतलेला आहे. त्यास ८ ते १५ दिवसासाठी स्थगिती दयावी. नसता या सभागृहाचा अपमान होईल.

मा महापौर : जे बांधकाम चालू आहे त्यास तात्पूरते प्रलंबीत करण्यात येत आहे. मा. आयुक्त यांनी लिगल ओपनीयन घ्यावे या सभागृहासमोर परीस्थिती कळवावी त्यानंतर परत यावर सभागृहात पूढील सभेत निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती जयश्री किवळेकर: सिडकोचे १ एप्रिल २००६ पासून महापालिकेत हस्तातरण झाले. हस्तातरण केले म्हणून शासनाने २५ कोटी तसेच व सिडकोने १५ कोटी या भागात विकास कामे करण्यासाठी उपलब्ध करून दिलेले आहे.९ महिने झाले एकही काम सिडको भागात झाले नाही. सिडको भागात ३९१ खूल्या जागा ३९ खेळाचे मैदान, ५६ उद्यान, ४४ सोसायटया तसेच ४२ गृहनिर्माण संस्था आहे. या ठिकाणी विकास करण्या संदर्भात प्रशासनाने काय पॉलीसी ठरविलेली आहे. सन २००६-०७ च्या वर्षाचा मालमत्ता कर तेथील नागरीकाकडून वसूल करणार आहोत. तेथे आतापर्यत कोणतीही सूविधा उपलब्ध करूनदिली नाही. सूविधा दयायच्या नसेल तर मालमत्ता कर वसूल करू नये. शिवाय या भागात पाणीपूरवठा एक दिवसाआड होवून कमी प्रमाणात पाणी दिले जाते.

मा.महापौर : सिडको भागात विकास कामे होत नाही या संदर्भात सिडको हडकोचे नगरसेवक तसेच पदाधिकारी व संबधीत अधिकारी यांची एक विशेष बैठक आठ दिवसात आयोजित करण्यात येईल.

सौ.पार्वती वाघमारे : माझा वार्ड संपूर्ण गुठेवारीत येतो. पुंडलिकनगरच्या टाकीतून जे जलवाहिनीने पाणी येणार आहे आतापर्यत माझ्या वार्डातील नागरीकानी ७ लक्ष रूपये भरणा केलेले आहे. पाण्याची व्यवस्था करावी नागरीक पैसे भरण्यास तयार राहतील.

मा.महापौर : ज्या ज्या भागातून जास्तीत जास्त निधी जमा झालेला आहे त्या भागात प्रशासनाने कामे करावी

श्री.सिताराम सुरे : माझ्या वार्डात अनेक लोकांनी पैसे भरणा केलेले आहे काम सूरू केलेले नाही.

श्री. त्र्यंबक तूपे : गुंठेवारी भागात विकास कामे करण्यासाठी पॉलीसी ठरलेली आहे काय कमीत कमी ज्या भागात ७ लक्ष रूपये जमा झाले. त्या भागात जमा झालेल्या रक्कमेच्या ८० टक्के रक्कम विकास कामावर खर्च करता येवू शकते.

मा. आयुक्त : सर्व भागाचे मिळून २ ते पावने दोन कोटी जमा झालेले आहे. ज्या ज्या भागातून गुंठेवारीचे पैसे जमा झाले तितक्या रक्कमेचे त्या भागातील नगरसेवकांनी कोणतेही काम सांगितले ते करण्यात येईल परंतू ज्या भागातून पैसे जमा झाले त्याच भागातील नागरीकांचा त्या काम केल्याचा उपयोग झाला पाहिजे.

श्री.त्र्यंबक तूपे : दोन तीन वार्डचे एकत्रित अंदाजपत्रक तयार केलेले आहे तसे न करता ज्या ज्या कॉलनीतून पैसे जमा झालेले असतील तेवढेच भागासाठी काम करावे. एका कामाचे अंदाजपत्रक ११ लक्षचे तयार केले दोन वार्डचे मिळून तयार केले. जोपर्यत ११ लक्ष वसूल होत नाही तोपर्यत काम होणार नाही.

श्री.सिताराम सुरे : माझ्या वार्डातून बारा लक्ष जमा झाले. विकास काम कोणतेच झाले नाही.

श्री.संतोष खेंडके : माझ्या वार्डात गूंठेवारीचे रक्क्म जमा झालेली आहे अशा रक्कमेतून प्रत्येक सदस्यांच्या वार्डात आवश्यक कामांना प्राधान्य देण्यात यावे.

मा.महापौर : ज्या ज्या भागातून गुंठेवारीचे पैसे जमा झाले त्या त्या भागात जमा झालेल्या रक्कमेतून विकास कामे करण्यात यावी.

**विषय क्र. ६०५/१ :**

दिनांक २७.१०.२००६,दिनांक ०४.११.२००६,१४.११.२००६ आणि दिनांक २०.११.२००६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभा/सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खॉन : दिनांक २७.१०.०६ च्या इतिवृत्तातील ठराव क्र.५५४ पान क्र २४ वर आरक्षणाचा प्रस्ताव आहे ऐनवेळी घेण्यात आलेला होता. जानेवारी १९९१ मध्ये ठराव पास केलेला आहे.असे यात दिले. ही जागा महानगरपालिकेचीच होती. जागेसंदर्भात ठेवलेले आहे मुस्ताफाबाद परंतू १९९१ चे रजिस्टर चोरी तसेच त्यावेळचे इत्तिवृत्ताचा गठ्ठा चोरी झालेले आहे.हा प्रस्ताव ऐनवेळी घेतला त्यावर चर्चा झाली नाही कायम झाले नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : हा प्रस्ताव कायम करू नये.

मा.महापौर : विषय क्र ५५४ हा पूर्ण कायम न करता प्रलंबीत करण्यात येतो.

श्री.काशिनाथ कोकाटे : दि. २७.१०.०६ च्या इतिवृत्तातील पान क्र २२ ठराव क्र ५५१ मध्ये दुसऱ्या विभागाचे बजेट घेवून ५० लक्ष हे इतर कामावर खर्च करण्याचा प्रस्ताव आहे. माझ्या माहिती प्रमाणे ज्या विभागाचे बजेट वळती करून घ्यायचे त्या विभाग

प्रमुखाचा अभिप्राय घेणे अपेक्षीत आहे व किती टक्के बजेट दुसऱ्या हेड मधून वळती करायचे याचा सूध्दा मर्यादा असाव्यात असे माझे मत आहे. मर्यादा नसल्यामूळे काही भागात कामे होतात काही भागात होत नाही.किमान या विषयाच्या बाबतीत तो बजेट वळती करण्याचा प्रस्ताव अनावधानाने आला असेल तो स्थगित किंवा रद्य करण्यात यावा.

मा.महापौर : बॉटनीकल गार्डनच्या लेखाशिर्षकातून बजेट वळती करू नये ते तसेच ठेवावे. सिडकोचे ठेवलेले पैसे त्यामधून काम करण्यास प्रस्ताव ठेवलेला असल्यामूळे त्यास स्थगिती देण्यात येत आहे.

श्री.संतोष खेंडके : तेथील कामाचे टेंडरही काढण्यात आले तरी सूध्दा बॉटनिकल गार्डमधील बजेट वळती केले जाते हे योग्य नाही.

श्री.संजय सिरसाट : एक किंवा दोन आवश्यक कामे असू शकतात. त्यामूळे एका वार्डातून एक किंवा दोन कामे करण्यासाठीच बजेट वळती करण्यात परवानगी दयावी.

श्री.प्रशांत देसरडा : विषय क्र ५४५ मध्ये सिडकोचे दोन कर्मचारी श्री.ठाकूर व श्री.साटोटे यांना प्रतिनियुक्तीवर घेण्याचा प्रस्ताव आहे. सर्वांना समान न्याय दयावा.विषय क्र १ हा संशोधनाचा विषय होण्याची शक्यता आहे यात हेड चेंजचे प्रस्ताव वगळता विषय क्र १ ला पूर्ण स्थगिती देण्यात यावी.

श्री.संजय सिरसाट : विषय क्र १ हा रद्य जरी करता येत नसेल तरी स्थगित करावे नंतर यावर पूढे कार्यवाही करावी. सगळेच प्रस्ताव तसेच आहे यानंतर १० भूखंडा संदर्भात एक प्रस्ताव आहे ते सगळेच स्थगित करावे.

श्री.देसरडा प्रशांत : विषय क्र. ५७६ वाचून घ्यावा व इतर सर्व विषयाला स्थगिती दयावी.

सौ.विजया रहाटकर : विषय क्र ५७५ मध्ये दुरूस्ती करायची आहे. या ठरावात उर्वरीत कामे करण्यासाठी याच एजन्सीला कामे करण्यास मान्यता देण्यांत यावी. तसेच या सोबत मागिल दि. २७.१०.०६ च्या सभेतील अनेक विषय हे ऐनवेळी घेण्यात आले ऐनवेळी विषय येतात त्यावर आम्हाला अभ्यास करता येत नाही. व इतिवृत्तात ते येतात त्यावेळी पून्हा त्यावर चर्चा होते. त्यासाठी यापूढे ऐनवेळी कोणतेही विषय घेण्यात येवू नये. विषय क्र ५५४ हा ही विषय ऐनवेळी आला व त्या त्या भागातील नगरसेवकांना विचारणा केलेली नाही. अनेक वेळा बाजूच्या वार्डातील प्रस्ताव सदस्य मांडतात जेंव्हा प्रशासनाकडे विचारणा केली असता आम्हाला काहीच माहित नाही तुमच्याच सदस्यांचाच प्रस्ताव आहेअसे सांगण्यात येते.त्यामूळे ज्या वार्डाचे सदस्य असतात त्यांना त्रास होतो.एक नाही असे अनेक विषय ऐनवेळी घेतले जातात ते यापूढे घेण्यात येवू नये.

श्री.किशनचंद तणवानी : ठराव क्र ५४७ समातर जलवाहिनी ही बीओटीवर न करता शासनाकडून केंद्रशासनाकडून अनुदान घेवून राबविण्यात यावी यास मंजूरी देण्यात यावी.

मा.उपमहापौर : आताच मा. महापौर यांनी म्हटले की ऐनवेळचे सर्व प्रस्ताव स्थगित राहणार आहे परंतू विनंती की मागिल बैठकीतील ऐनवेळचा विषय क्र ५४७ मंजूर करावा जे की बीओटीवर समांतर जलवाहिनी न करता शासनाकडून महानगरपालिकेचा निधी यातून खर्च करून टाकावी असा तो प्रस्ताव आहे.

मा.महापौर : विषय क्र ५४७,५५८ वगळून सर्व ऐनवेळचे विषय स्थगित करण्यात येते.

(याच वेळी आयुक्त म्हणून शहर अभियंता श्री.सी.एस.सोनी हे काम पाहतात.)

डॉ.आशा बिनवडे : ऐनवेळचे विषय हे चर्चा करण्यासाठी विषयपत्रिकेवर आले पाहिजे मंजूर नामंजूर करण्याची संधी जाते व ते इतिवृत्तांत येते व नंतर दुरूस्त करण्याचीच संधी मिळते मंजूर करण्याचे आमच्यावर बंधन येते. ऐनवेळचे विषय हे जे आवश्यक आहे तेच घेण्यात यावे. २५ विषयापैकी १५ विषय हे लेखाशिर्षक बदलण्याचे आहे त्याशिवाय जे विषय आहे ते स्थगित ठेवावे. पूढच्या वेळी इतिवृत्तात कायम करण्यासाठी चर्चा करावी.

श्री.संजय सिरसाट : ठराव क्र ५६२ हा क्रांतीचौक ते चिकलठाणा या रस्त्यास छत्रपती शिवाजी महाराज महामार्ग असे नाव देण्याचा महत्वाचा प्रस्ताव आहे, त्यास मंजूरी दयावी.

मा. महापौर : तो विषय कायम करण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार आणि स. सदस्यांच्या मागणी नूसार दिनांक २७.१०.२००६ रोजी संपन्न झालेल्या सभेतील .........

ठराव क्र ५५१ अन्वये बॉटनीकल गार्डनच्या लेखाशिर्षकातून बनेवाडी राहूलनगर, सादातनगर, खामनदीच्या रीटनींग वॉल बाधण्यासाठी वळती करण्यात येणारी रक्कम रूपये ५० लक्ष ही बॉटनीकल गार्डनच्या कामाकरीताच ठेवण्यास ..........

तसेच ऐनवेळी ठेवण्यात येवून सम्मत झालेले ठराव क्र.५४३ ते ५७७ पर्यतचे (ठराव क्र. ५४७,५५८, ५६२) तीन ठराव वगळून सर्व प्रस्ताव स्थगित ठेवण्यासह दिनांक २७.१०.२००६, ४.११.२००६,१४.११.२००६ आणि २०.११.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

मा.महापौर : विषय क्र.२ ते ५ मंजूर.

**विषय क्र. ६०६/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०७ अंतर्गत मो.प्रभात नगर व गाढेनगर भागात ३०० मी.मी. व २२५ मी.मी. आर.सी.सी. व चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन २००५-२००६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून अ.प.र.रू.९,९७,०००/- होत आहे.

प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून प्रस्तावीत आहे.

अंदाजपत्रक र.रू.९,९७,०००/- चे प्रस्तावीत काम उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून करून घेणेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०७ अंतर्गत मो.प्रभात नगर व गाढेनगर भागात ३०० मी.मी. व २२५ मी.मी. आर.सी.सी. व चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू.९,९७,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च

२००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०७/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६ अंतर्गत श्रावस्तीनगर भागात २२५ मी.मी. व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन २००५-२००६ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून अ.प.र.रू.४,३१,२००/- होत आहे.

प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून प्रस्तावीत आहे.

अंदाजपत्रक र.रू.४,३१,२००/- चे प्रस्तावीत काम उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून करून घेणेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६ अंतर्गत श्रावस्तीनगर भागात २२५ मी.मी. व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू.४,३१,२००/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०८/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७ अंतर्गत मो.साठेनगर व नवयुग कॉलनी भागात ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन २००५-२००६ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून अ.प.र.रू.९,९७,२२५/- होत आहे.

प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून प्रस्तावीत आहे.

अंदाजपत्रक र.रू.९,९७,२२५/- चे प्रस्तावीत काम उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून करून घेणेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७ अंतर्गत मो.साठेनगर व नवयुग कॉलनी भागात ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू.९,९७,२२५/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०९/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक ८४ अंतर्गत भारत नगर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन २००५-२००६ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून अ.प.र.रू.७,१२,४८०/- होत आहे.

प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून प्रस्तावीत आहे.

अंदाजपत्रक र.रू.७,१२,४८०/- चे प्रस्तावीत काम उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून करून घेणेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक ८४ अंतर्गत भारत नगर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू.७,१२,४८०/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/ नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ६१०/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत गाडगेबाबा यांची यावर्षी ५० वी पुण्यतिथी साजरी होत आहे. संत गाडगेबाबा यांनी जे प्रचंड सेवाकार्य केले, महाराष्ट्रभर धर्मशाळा बांधल्या, वस्तीगृह,आश्रमशाळा, गो-शाळा उभारल्या आपल्या हजारो किर्तनातून स्वच्छतेचा महान संदेश दिला. आजही संत गाडगेबाबा यांच्या नावे स्वच्छता अभियान सुरू आहे. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची प्रेरणा सतत मिळावी व त्यांची जयंती, पुण्यतिथी दरवर्षी महानगरपालिकेतर्फे साजरी करण्यात यावी. नव्या पिढीला स्वच्छतेची व संत गाडगेबाबा कार्याची माहिती व्हावी व त्यापासून त्यांना स्फुर्ती मिळावी या उद्देशाने महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान येथे त्यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.महेश माळवतकर　　　　अनुमोदक : श्री.संजु रिडलॉन

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान : सिध्दार्थ उद्यानमध्ये पूतळा लावण्यास माझा विरोध नाही परंतू यापूर्वी गौतम बुध्दाचा पूतळा लावणार आहात असे किती पूतळे लावण्यात येणार आहे. तेथे २० ते २२ लक्ष लोक येतात जर कूणी विटबंना केली तर शहराचे वातावरण खराब होवू शकते यानंतर तेथील उद्यान प्राणीसंगृहालय हटविण्यात येणार आहे. यासाठी या संदर्भात कमेटी करावी योग्य ठिकाणी बसविण्याचा विचार करावा. प्रस्ताव येण्या अगोदर साईड बघावी. या प्रस्तावास स्थगिती दयावी जेंव्हा आपल्याला वाटेल अमूक जागा चांगली आहे त्या ठिकाणी बसविण्याचा विचार करावा.

मा.महापौर : सिध्दार्थ उद्यान मध्ये योग्य ठिकाणी जागा बघूनच हा पूतळा उभारण्यात येईल.हा प्रस्ताव मंजूर करू व पूढच्या वेळेस जागेची पाहणी करूनच मंजूरी दिली जाईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत गाडगेबाबा यांची यावर्षी ५० वी पुण्यतिथी साजरी होत असल्यामूळे, महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान येथे त्यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : विषय क्र ७ ते ९ मंजूर.

**विषय क्र. ६११/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००६-२००७ पान क्र. डब्ल्यु-१९ कामाचे नांव दत्तनगर, बापूनगर, बहादूरपुरा चुनाभट्टी गांधीनगर, कॉंक्रेटींग करणे र.रू.२,००,०००/- (दोन लाख) हे काम स्पील ओव्हर कामामध्ये ठेवण्यात आलेले आहे. व स्लम विभागामार्फत ठेवण्यात आलेले आहे. हे काम अतिरिक्त शहर अभियंता कडुन बांधकाम विभाग यांच्याकडुन करून घेण्यात यावे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजु सुग्रीम रिडलॉन अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-२००७ पान क्र. डब्ल्यु-१९ कामाचे नांव दत्तनगर, बापूनगर, बहादूरपुरा चुनाभट्टी गांधीनगर, कॉंक्रेटींग करणे र.रू.२,००,०००/- (दोन लाख) हे स्पील ओव्हर मध्ये असलेले काम स्लम विभागामार्फत न करता, अतिरिक्त शहर अभियंता बांधकाम विभाग यांच्याकडुन करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१२/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९६ येथील अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान क्र.१४१ वरील सिल्कमिल कॉलनी अंतर्गत खडीकरण करणे या कामासाठी र.रू.५ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. या ५ लाख रूपयातुन र.रू.२.५ लाख हजरत शाहशोक्ता कब्रस्तान मध्ये जाणाऱ्या रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे कामासाठी वर्ग करण्यात यावे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अयुबखान

अनुमोदक : श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन, श्री.सय्यद खुसरो बुऱ्हानोद्दीन.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९६ करीता अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान क्र.१४१ वरील सिल्कमिल कॉलनी अंतर्गत खडीकरण करणे या कामासाठी असलेल्या र.रू.५.०० लाखाच्या तरतुदीतून र.रू.२.५ लाख हजरत शाहशोक्ता कब्रस्तान मध्ये जाणाऱ्या रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१३/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आगामी अर्थसंकल्प पुस्तिकात पान क्र.डब्ल्यु-५२ वर''दिल्ली गेट येथील म.न.पा. कर्म.क्वॉर्टरची दुरूस्ती करणे अंदाज रक्कम रू.३.९५ अशी तरतुद आहे. **<u>या कामाऐवजी</u>** ''वार्ड क्र- २९ गणेश कॉलनी मध्ये फरशी दुरूस्ती, खडी रस्ते, पेव्हर ब्लॉक, गटारी दुरूस्ती, जलनि:सारण कामे व इतर आवश्यकते नुसार फुटकळ कामे. वार्ड कार्यालय '' क'' जाफर गेट कडे वळती र.रू.३.९५ लाख. सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.पटेल सलिम शमशेर पटेल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प पुस्तिकात पान क्र.डब्ल्यु-५२ वर''दिल्ली गेट येथील म.न.पा. कर्म.क्वॉर्टरची दुरूस्ती करणे रक्कम रू.३.९५ असलेली तरतुद **या कामाऐवजी** ''वार्ड क्र- २९ गणेश कॉलनी मध्ये फरशी दुरूस्ती, खडी रस्ते, पेव्हर ब्लॉक, गटारी दुरूस्ती, जलनि:सारण कामे व इतर आवश्यकते नुसार फुटकळ कामे करणेस व वार्ड कार्यालय '' क'' जाफर गेट कडे वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१४/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीसाठी मंजूर झालेल्या विकास योजनेत मौजे मिटमिटा येथील गट नं.१३७ ते १४०, १५१ ते १५५, हा परिसर विकास झोन मध्ये असुन या भागात ले-आऊट मंजुर झालेले असुन १२ मीटर, १५ मीटर व १८ मीटर रूंदीचे विकास योजना रस्ते देखील महानगरपालिकेने ताब्यात घेतलेले असुन मुंबई रस्त्यापासून दक्षिणेला ३० मीटर (१०० फुट) रस्त्याला जोडणारा १८ मीटर रूंद सुमारे ३६० मीटर लांबीचा रस्ता असुन या रस्त्यापैकी सुमारे २९० मीटर लांबीसाठीचा रस्ता महानगरपालिकेच्या ताब्यात असुन मुंबई रस्त्यापासुन गट नं.१३९ पैकी सुमारे ७० ते ७५ मीटर लांबीचा विकास योजना रस्त्यासाठी जागा संपादन केल्यास हा परिसर विकसीत होण्यास मदत होईल. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय जगताप                    अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो

मा.महापौर                    : हा प्रस्ताव स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित करण्यास मान्यता देण्यांत आली.

**पुरवणी विषय**

**विषय क्र. ६१५/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३० हर्षनगर मध्ये जलवाहिणी टाकणे व स्थलांतरीत करणे साठी अर्थसंकल्पात ४ लक्ष तरतुद करण्यात आली आहे, तथापी दिनांक २५.९.२००६ रोजी (दि.२०.९.२००६ ची तहकुब) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.४४७ अन्वये उक्त कामा ऐवजी वार्ड क्र.३० मध्ये विविध ठिकाणी पेव्हील ब्लॉक बसविणे व कॉंक्रीट दुरुस्त करणेसाठी लेखाशिर्षकात बदल करण्याचा प्रस्ताव पारीत करण्यात आलेला आहे.

तरी वरील दोन्ही कामा ऐवजी वार्ड क्र.३० मध्ये अत्य आवश्यक असलेले मोहल्ला फाजलपुरा येथील श्री.भिसे यांच्या घराच्या पाठीमागील नाल्याला संरक्षित भिंत बांधण्यासाठी लेखाशिर्षकात बदल करण्यात येऊन र.रू.४.०० लक्ष तरतुद उक्त कामास वळती करून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.शोभा हरिश्चंद्र मिटकर                    अनुमोदक : सौ.छाया विलास राऊत

मा.महापौर                    : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३० हर्षनगर मध्ये जलवाहिणी टाकणे व स्थलांतरीत करणे साठी अर्थसंकल्पात ठेवण्यात आलेली र.रू.४.०० लक्ष तरतुद मोहल्ला फाजलपुरा येथील श्री.भिसे यांच्या घराच्या पाठीमागील नाल्याला संरक्षित भिंत बांधण्यासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ६१६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजना ही जिल्हास्तरीय व विशेष घटकातील लाभार्थीसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील अनुसूचीत जाती तसेच नवबौध्दांसाठी असलेल्या प्रवर्गामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीमध्ये अनुसूचीत जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा वस्त्यामध्ये पाणी पुरवठा जलवाहीणी टाकणे व पिण्याचे स्त्रोत बळकट करणे या कामाचा समावेश आहे.

पाणी पुरवठा जलवाहीणी टाकणे व पिण्याचे स्त्रोत बळकट करणेसाठीच्या कामासाठी राज्यशासन निर्णय नागरीक दलित वस्ती सुधारणा योजना अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक नांवे विहीत करणे विघयो-१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-४,दिनांक ५.३.२००२ अन्वये प्रसिध्द केला आहे. यातील नमूद मार्गदर्शक तत्वानुसार महानगरपालिकेस रूपये १००.०० लाखापर्यंत अनुज्ञेय प्राप्त होवू शकतो. सदर अनुदान प्राप्त होणेसाठी वरील नमुद शासन निर्णयातील कलम ७ नुसार कार्यपध्दतीचा अवलंब करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने सदरच्या अनुदानातून सहभाग नोंदविण्यासाठी....

०१. वार्ड क्र.८०, अंबिका नगर, मुकूंदवाडी या अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या वार्डात नागरी सुविधासाठी पाणी पुरवठा जलवाहीणी टाकणे व पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे या कामाचा समावेश करण्यात येत आहे. संतोषी माता नगर, राजीव गांधी नगर येथे १०० मी.मी.,१५०, २००,२५० मी.मी.डी.आय.के.९ जलवाहीणी टाकणे कामाचे अंदाजपत्रक रूपये ९४,६३,१९२/- एवढे होते. तसेच

०२. वॉर्ड क्र.६५ मधील सौजन्यनगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.९ जलवाहीणी टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१०,४५,७००/- एवढे होते. सदर कामास अनुदान अनुज्ञेय होणेसाठी प्रस्तावीत कामाची निवड व निश्चित करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेचा ठराव पारीत होणे आवश्यक आहे. त्यानंतर शासन निर्णयातील कलम ७ मधील (३) च्या तरतूदीनुसार मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे निधीच्या उपलब्धतेसाठी सादर करण्यात येईल.

करीता, उपरोक्त कामाची नागरी दलितवस्ती सुधार योजनेच्या कामासाठी निवड व निश्चिती करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर		: दलित सूधार योजनेचे विषय ठेवलेले आहे ते मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा जलवाहीणी टाकणे व पिण्याचे स्त्रोत बळकट करणेसाठीच्या कामासाठी राज्यशासन निर्णय नागरीक दलित वस्ती सुधारणा योजना अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक नांवे विहीत करणे विघयो-१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-४,दिनांक ५.३.२००२ अन्वये....

०१.वार्ड क्र.८०, अंबिका नगर, मुकूंदवाडी या अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या वार्डात संतोषीमाता नगर, राजीव गांधी नगर येथे १०० मी.मी.,१५०, २००,२५० मी.मी.डी.आय.के.९ जलवाहीणी टाकणे कामाचे र.रू.९४,६३,१९२/- अंदाजपत्रकास तसेच

०२.वॉर्ड क्र.६५ मधील सौजन्यनगर येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.९ जलवाहीणी टाकण्याच्या कामाचे र.रू.१०,४५,७००/- अंदाजपत्रकास तसेच शासन निर्णयातील कलम ७ मधील (३) च्या तरतूदीनुसार मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे निधीच्या उपलब्धतेसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको भागातील एन-९,एच सेक्टर येथील प्लॉट क्र.१९ ते सत्संग भवन पर्यंत अस्तित्वात असलेला नाला ट्रेनिंग करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सन २००५-०६ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून अ.प.र.रू.३०,१७,१३५/- होत आहे.

प्रस्तुत कामाचा खर्च वित्त आयोगाकडून प्राप्त रकमेतून एक कोटी पन्नास लक्ष रूपये जलनि:सारण विभागाकडे वळती करून त्यामधून भागविणेचे प्रस्तावित आहे. तरी अ.प.र.रूपये ३०,१७,१३५/- आणि वित्त आयोगाकडून प्राप्त निधीमधून रू.दीड कोटी जलनि:सारण विभागासाठी वळती करणेच्या कार्यवाहीस मंजूर व्हावी. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको भागातील एन-९,एच सेक्टर येथील प्लॉट क्र.१९ ते सत्संग भवन पर्यंत अस्तित्वात असलेला नाला ट्रेनिंग करण्याच्या कामाचे र.रू.३०,१७,१३५/- च्या अंदाजपत्रकास तसेच वित्त आयोगाकडून प्राप्त निधीमधून रू.दीड कोटी जलनि:सारण विभागासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक आणि प्रशासकिय कार्यवाही करावी.

**विषय क्र. ६१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पीय पुस्तीकेत पा.क्र.डब्ल्यु-५९ वर ऑक्सीडेशन पॉंड दुरूस्ती करणे यासाठी र.रू.१५ लक्ष तरतूद उपलब्ध आहे. या तरतूदीतुन (१) र.रू.१० लक्ष महानगरपालिका हद्दीतील/शहरातील मलनि:सारण प्रक्रीया (Eco-friendly) करणे या कामाच्या प्रात्यक्षीकासाठी आणि (२) नाला पात्रातील विस्थापितांचे पुनर्वसन करणे संदर्भाने नारेगांव येथील गट क्र.४ चे सर्वेक्षण व मोजणी करून रेखांकन तयार करणेच्या कामाचे शुल्क अदा करणे.

वरील दोन्ही कामासाठी अर्थ तरतूद वळती करणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. महापौर : तीनही प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

श्री.त्र्यबंक तूपे : एक लक्षची कामे होत नाही १५ लक्षचे प्रस्ताव मंजूर करीत आहे हे योग्य नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : ज्या वेळेस अर्थसंकल्प मंजूर केला ज्या कामावर तरतूद करण्यात आली . त्या कामाच्या संचिका लेखा विभागात गेल्यानंतर त्या रोखण्याचा अधिकार त्या विभागाला आहे काय?कोणत्या अधिकारात संचिका रोखल्या जातात याचा खूलासा करण्यात यावा.

प्र. मुख्यलेखाधिकारी :सन २००६-०७ या वर्षातील बजेटमधील ४३ कोटीची कामे स्पील ओव्हरची होती तसेच ११५ कोटीचे कामास अर्थसंकल्पास मान्यता दिली होती. वसूली तेवढी होणार होती त्यातूलनेनूसार अंदाजपत्रके तयार केलेली होती. परंतू वसूलीचे प्रमाण बघीतले तर वार्षीक ५० ते ६० कोटीची तूट जाण्याची शयता आहे. वसूली

होत नसेल तर कामांना मंजूरी देणार कशी.तसा प्रस्ताव स्थायी समितीला ठेवणार आहोत.

श्री. प्रशांत देसरडा : वसूली करण्याचे अधिकार प्रशासनाचे आहे. वार्ड अधिकारी वसूली का करीत नाही.जी वसूली आली ती रकम कूठे खर्च केलेली आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :लेखा विभागास बजेट प्रोव्हीजन व्यतिरित इतर इंटरफेर करण्याचे कूठलेही अधिकार नाही. नगरसेवकांनी संचिका घेवून १० वेळा लेखा विभागात जायचे हे योग्य नाही. १६.१०.२००६ रोजी एक संचिका लेखा विभागात गेलेली असून ती संचिका आज रोजी लेखा विभागातून आलेली आहे. अंदाजपत्रकाच्या संचिकेस इतका उशीर होत असेल तर एजन्सी निश्चित करण्याच्या संचिकेची काय परीस्थिती असेल. बजेट प्रोव्हजन नूसार ज्या कामासाठी बजेट मध्ये तरतूद असेल व ती संचिका लेखा विभागात गेल्यास ती मंजूर करण्यास नाकारता येणार नाही. गैरवापर ते करीत आहात हे सिध्द होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्या कामाचे अंदाजपत्रक तयार झालेले आहे त्या संचिका मंजूर कराव्यात उर्वरीत कामासाठी तरतूद उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे : काही क्रिडा स्पर्धा घेण्याचे अधिकार मा. महापौरांना आहे. खो खो सारख्या खेळाच्या आंतर राष्ट्रीय स्पर्धा घेण्यात आल्या सभागृह नेता यांनी या सभागृहात त्या संबधीचा ठराव मंजूर केला त्याची अमलबजावणी होत नसेल तर हे सभागृह चालवण्यावर आपले काय कन्ट्रोल आहे हे तपासावे लागेल.

मा.महापौर : मी महापौर झाल्यानंतर खो खो संघटनेचे पदाधिकारी माझ्याकडे आले मी त्यास मंजूरी दिली. त्यानंतर लेखाधिकारी यांना बोलवून घेतले तर बजेटमधील १० लक्ष खर्च झालेला होता. ३० लक्षचे बजेट होते ५२ लक्ष खर्च झाले म्हणून या वर्षात कुठलाही महापौर चषक घेता येणार नाही असे सांगितले.

श्री. काशिनाथ कोकाटे : जो १० लक्ष खर्च केला तो कोणत्या हेड मधून केलेला आहे. चार लक्ष रूपये या खेळासाठी का उपलब्ध होवू शकले नाही.फुटबॉल च्या स्पर्धा घेतल्या खो खो स्पर्धा जाणून बूजून घेतलेल्या नाही. हे योग्य नाही.

मा. महापौर : रिवाईज बजेटमध्ये जे काही महापौर चषक असतील ते घेण्यात यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे : विकास कामाच्या संचिका रोखण्याचे काम स्थायी समिती सर्वसारण सभेला आहे. कोणते ही काम थांबविण्याचे अधिकार लेखा विभागात नाही. वरील करण्याचे काम हे प्रशासनाचे आहे वसूली का होवू शकलेली नाही हे प्रशासनास विचारणा करावी.

मा. महापौर : आतापर्यत जे जे कामाचे अंदाजपत्रक तयार झालेले आहे त्या त्या कामास लेखा विभागाने मंजूरी दयावी. लवकरच रिवाईज बजेटसाठी प्रस्ताव करून ते बजेट करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पीय पुस्तीकेत पा.क्र.डब्ल्यु-५९ वर ऑक्सीडेशन पॉंड दुरूस्ती करणे यासाठी उपलब्ध असलेल्या र.रू.१५.०० लक्ष तरतूदीमधून

(१)र.रू.१०.०० लक्ष महानगरपालिका हद्दीतील/शहरातील मलनि:सारण प्रक्रीया (Eco-friendly) करणे या कामाच्या प्रात्यक्षीकासाठी आणि (२) नाला पात्रातील विस्थापितांचे पुनर्वसन करणे संदर्भाने नारेगांव येथील गट क्र.४ चे सर्वेक्षण व मोजणी करून रेखांकन तयार करणेच्या कामाचे शुल्क अदा करणेकरीता तरतूद वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा येथे आरोग्य केंद्र बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर आरोग्य केंद्राच्या कामांतर्गत विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी रूपये ०.८५ लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. तथापी सदर आरोग्य केंद्राच्या पूर्ण विद्युतीकरणासाठी ठेवलेली तरतूद ही पुरेशी नाही.

सन २००५-०६ मध्ये खर्च न झालेल्या / पूर्ण झालेल्या स्पील ओव्हर २००६-०७ मध्ये बायजीपुरा महानगरपालिका कर्मचारी निवासस्थानाचे विद्युतीकरण करणे साठी अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये स्पील ओव्हर कामांतर्गत नवीन व जुन्या इमारतीचे विद्युतीकरण करणे (मुख्य कार्यालय) या लेखा शिर्षाखाली डब्ल्यु-३४/पान क्र.९ नुसार रूपये २.५० लक्षची तरतूद ठेवलेली आहे.

बायजीपुरा महानगरपालिका कर्मचारी निवासस्थानाचे विद्युतीकरणाचे काम तात्काळ हाती घेणे आवश्यक नाही. करीता उक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे चिकलठाणा येथे नव्याने बांधण्यात येत असलेल्या आरोग्य केंद्राच्या विद्युतीकरणासाठी, स्पील ओव्हर कामांतर्गत नवीन व जून्या इमारतीचे विद्युतीकरण करणे (मुख्य कार्यालय) या लेखा शिर्षाखाली डब्ल्यु-३४/पान क्र.९ नुसार ठेवलेली तरतूद रूपये २.५० लक्ष ही चिकलठाणा येथील आरोग्य केंद्रात विद्युतीकरणाचे कामासाठी 'नवीन व जून्या इमारतीचे विद्युतीकरण करणे' (नवीन कामे २००६-०७/ मुख्य कार्यालय तरतूद) या लेखाशिर्षाखाली वळती करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथे नव्याने बांधण्यात येत असलेल्या आरोग्य केंद्राच्या विद्युतीकरणासाठी, स्पील ओव्हर कामांतर्गत नवीन व जून्या इमारतीचे विद्युतीकरण करणे (मुख्य कार्यालय) या लेखा शिर्षाखाली डब्ल्यु-३४/पान क्र.९ नुसार ठेवलेली तरतूद रूपये २.५० लक्ष ही चिकलठाणा येथील आरोग्य केंद्रात विद्युतीकरणाचे कामासाठी 'नवीन व जून्या इमारतीचे विद्युतीकरण करणे' (नवीन कामे २००६-०७/ मुख्य कार्यालय तरतूद) या लेखाशिर्षाखाली वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२० :**

मा.आयुक्त, यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संचालक नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांच्या सूचनेनुसार ५३ घोषित व आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील नागरीक मोठ्या प्रमाणांत राहतात अशा ९४ वसाहतींची यादी करून वार्ड अधिकारी यांच्या अधिपत्याखाली दारिद्रय रेषे खालील कुटूबांचे सर्वेक्षण करण्यात आले सर्वेक्षण न केलेल्या शहरातील इतर वसाहतींमधील कुटूंबिया करीता या कार्यालयातर्फे स्थानिक वृत्तपत्रातून जाहीर प्रगटन प्रकाशित करण्यात आले आहेत.

१. जा.क्र.मनपा/दानिक/२००५/९३१, दि.१६.०९.२००५ अन्वये सर्वेक्षणा पासून वंचित राहीलेल्या कुटूंबाकडून दि.२३.०९.२००५ ते ३०.०९.२००५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले.

२. दुसरे जाहीर प्रगटन स्थानिक वृत्तपत्रातून प्रकाशित करण्यात आले जा.क्र.मनपा/दानिक/२००५/ १००२ दि.१.१०.२००५ अन्वये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा लाभ घेण्यासाठी, लाभार्थी निश्चित

करण्यासाठी सदर सर्वेक्षण करण्यात येत असल्या बाबत जाहीर प्रगटन प्रकाशित करण्यात आले. सर्वेक्षणा पासून वंचित राहीलेल्या नागरीकांनी अर्ज करावेत यासाठी पून्हा १ ऑक्टो ते १५ ऑक्टो ०५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. आलेल्या अर्जावर संबंधित वार्ड कार्यालयाकडून स्थळ पाहणी करण्यांत आली.

३. तिसरे जाहीर प्रगटन स्थानिक वृत्तपत्रांमधून प्रकाशित करण्यात आले. जा.क्र./मनपा/दानिक/२००५/११८२ दि.२२.११.२००५ नुसार सर्वेक्षण पूर्ण झाल्यावर सर्वेक्षणाच्या याद्या वॉर्डात पाहणीस्तव उपलब्ध करण्यात आल्या होत्या. दि.१६ नोव्हें ते ३० नोव्हें २००५ पर्यंत आलेल्या आक्षेप व सूचना यांच्यावर संबंधीत वार्ड कार्यालयातर्फे कार्यवाही करण्यात येत असल्याबाबत तसेच सर्वेक्षण परीपूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून स्थानिक वृत्तपत्रातून जाहीर प्रसिध्दी देण्यात आली होती. (यानुसार वार्ड अ-४८७, वार्ड-ब-५, वार्ड क-४५, वार्ड ड-२३९२, वार्ड इ-निरंक, वार्ड फ-३५६ असे एकूण ३२८५ आक्षेप प्राप्त झाले होते.) ते सर्व आक्षेप अर्ज संबंधित वार्ड कार्यालयाकडून स्थळ पाहणी करून निकाली काढले आहेत.

शहरातील दारिद्रय रेषे खालील कुटूंबांचे सर्वेक्षण पूर्ण करून संगणकात डाटा फीड करण्याचे काम एजन्सीद्वारे पूर्ण करण्यात आले. सदर काम इंग्रजीमध्ये करून देण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.२००६/नपाप्र/सुजशरोयो/सर्वे/३५० दि.१०.०४.२००६ नुसार भाषांतराचे काम सुरू करण्यात आले या कामात तांत्रिक अडचणी आल्यामूळे कामाची गती कमी झाली. तांत्रिक समस्या बाबत या कार्यालयातर्फे जा.क्र.मनपा/प्रकल्प/०६/१५५ दि.३०.०८.०६ नुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे कळविण्यात आले होते. त्यानुसार नपप्रस/संअ/६३३/२००४ दि.५.०९.२००६ नुसार संगणकावर काम करणाऱ्या संस्थेतील कर्मचाऱ्यांना नगर परिषद संचालनालय मुंबई येथे दि.३.१०.२००६ ते ७.१०.२००६ च्या दरम्यानच्या काळात प्रशिक्षण देण्यात आले व नवीन सूचना करण्यात आल्या त्यानुसार इंग्रजी भाषेतून डाटा फिड करून आपले पत्र क्र.मनपा/प्रस/दारेकु/सर्वे/२००६/२०२ दि.६.११.२००६ मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना २ सीडी देण्यात आल्या जा.क्र.२००६/नपाप्र/कावि/१५४० दि.४.१२.२००६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून सीडी ओपन होत नसल्यामूळे परत आल्या.

नगर परिषद प्रशासन संचालनालयाच्या सूचने नुसार सदर याद्या आमसभेच्या निदर्शनास आणून द्याव्या. त्यानुसार सदर सर्वेक्षण याद्या सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणून देण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सर्वेक्षणानुसार अ प्रपत्राची १७७३५ कुटूंबे व ब प्रपत्राची ५६४९५ कुटूंबे अशी एकूण ७४२३० कुटूंबाचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. दारिद्रय रेषे खालील कुटूंब यादी शासनातर्फे अंतिम करण्यात येणार आहे. याद्या नगर सचिव विभागाकडे पाहणीस्तव आठ दिवसासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. माहितीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा.महापौर : शहरातील द्रारिद्रय रेषेखालील कुटूंबाची माहिती घेवून यादी तयार करण्यात आलेली आहे. ती यादी प्रकल्प विभागामध्ये पाहण्यासाठी ठेवलेली असून त्यात आणखी काही सूचना व समावेश करावयाचा असेल ते करू शकतो. हे सभागृहाच्या माहितीसाठी ठेवलेले आहे.

श्री.संजय जोशी : प्रत्येक वार्ड कार्यालयात यादी ठेवण्यात यावीत.

मा.महापौर : प्रत्येक वार्ड कार्यालयात याची यादी ठेवण्यात यावी त्या त्या वार्डातील नगरसेवक यांनी तेथे पाहणी करावी जर द्रारीद्रय रेषेखालील कुटूंब सूटले असेल तर पुन्हा सर्वेक्षण करून संबधीत अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील कुटूंबाचे सर्वेक्षणाची अंतरिम यादी सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आली. सदर यादी नगर सचिव विभागात न ठेवता आठ दिवसासाठी सर्व प्रभाग कार्यालयामध्ये नागरीक व स.नगरसेवक यांचे पाहणीस्तव ठेवण्यात याव्यात व ज्या स.नगरसेवकांना काही पात्र कुटूंबांची नांवे समाविष्ट करावयाची असल्यास कुटूंबाचे अर्ज प्रभाग कार्यालयात सादर करावेत. वरील दुरूस्तीसह प्रस्तावास मान्यता देण्यांत येते. सध्या तयार केलेली सी.डी. शासनास पाठवावी. उर्वरित नांवे पुरवणी यादी म्हणून नंतर शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२०– अ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सभापती स्थायी समिती यांनी शहरातील संपुर्ण नाल्यांची वर्षभर सफाई करण्यासाठी एक जेसीबी, दोन टिप्पर,पाच मजुर इत्यादीचे एक पथक स्थापन करून त्यांचे मार्फत वर्षभर शहरातील नाल्यांची सफाई करून घेण्याच्या सुचना दिल्या आहेत. तद्अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील नाल्याची सद्यस्थिती विचारात घेता फक्त जेसीबी यंत्राव्दारे सर्व ठिकाणची नाले सफाई करून घेणे शक्य नाही.कारण नाल्यालगत वसाहती झालेल्या आहेत. तसेच काही ठिकाणी नाल्या लगत दगडी भिंती आहेत. अशा ठिकाणी नाल्याच्या तळाला जेसीबी यंत्र पोहचू शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या ठिकाणी जास्त मजुर वर्गामार्फत केर-कचरा व गाळ काढावा लागेल आणि ज्या ठिकाणी टिप्पर जाऊ शकत नाही त्या ठिकाणाहून ट्रॅक्टर व्दारे अथवा छोट्या ट्रॉली व्दारे हातगाडी योग्य त्या ठिकाणपर्यंत वाहतूक करावी लागेल. २ ते ३ किलोमीटरच्या परिसरात उपलब्ध होणाऱ्या किंवा खुल्या जागेवर नाल्यातुन काढलेला मलबा टाकल्यास त्या परिसरातील नागरीक मलबा टाकणेस विरोध दर्शवितात. त्यामुळे दुरवर, वस्तीच्या बाहेर नाल्यातून काढलेला मलबा वाहुन नेण्याचे झाल्यास त्यासाठी दोन टिप्पर देखील अपुरे पडण्याची शक्यता आहे.

शहरातील नाल्यांची सद्यस्थिती विचारात घेता वर्षभर नाले सफाई करण्याचे ठरल्यास किमान खालील यंत्र सामुग्री खरेदी करून खाजगी संस्थेस/कंत्राटदारास उपलब्ध करून देण्यात येईल.

नालेसफाईसाठी लागणारा मजूरवर्ग व इतर सर्व साहित्य.उदा.फावडे, टोपले, बांबू, छोट्या ट्रॉली, हातगाड्या मजूरांसाठी सुरक्षा साहित्य इ.बाबींची जबाबदारी कंत्राटदाराकडे/खाजगी संस्थेकडे राहील.

१. जे.सी.बी. यंत्र - २
२. टिप्पर - २
३. ट्रॅक्टर - २

उपरोक्त यंत्रसामुग्री एखाद्या खाजगी संस्थेस/कंत्राटदारास उपलब्ध करून देऊन त्यांचे मार्फत वर्षभर नालेसफाई करून घेण्यात येईल. विभागातील कार्यरत शाखा अभियंता यांचे माध्यमातून खासगी संस्थेच्या कंत्राटदाराच्या वर्षभराच्या कामावर नियंत्रण ठेवता येईल. तरी उपरोक्त नमूद यंत्र सामुग्री/वाहने खरेदी करून वर्षभर नाले सफाई करणेचा प्रस्ताव मंजूरीच्या निर्णयास्तव सादर.

**चर्चा :**

श्री. त्र्यबक तुपे : दरवर्षी नाले सफाई साठी लाखो रूपये खर्च होतात.काम कूठेच झालेले दिसून येत नाही वर वर कचरा काढला जातो खाली घाण तशीच राहाते. यासाठी पॉलीसी ठरवावी .

श्री.भगवान घडमोडे : सफाईचे खाजगीकरण केले जाते एकीकडे नाले सफाई होत नाही. म्हणून मशीन घेत आहे नेमके धोरण काय ?

श्री.त्र्यबंक तूपे : खाजगीकरण करायचे असेल तर मशीन घेण्याची गरज नाही.

प्र.आयुत : दरवर्षी नाल्याची सफाई टेंडर काढून केली जाते. ते बरोबर साफ होत नाही. आजू बाजूच्या लोकांना त्रास होतो तक्रारी येत आहे. वर्षभर नाले सफाईचे काम चालू रहावे यासाठी हे वाहने घेणे गरजेचे आहे.

मा. उपमहापौर : या प्रस्तावात असे दिले की ही मशीनरी घेवून खाजगी ठेकेदारामार्फत ही साफ सफाई करून घेणार आहोत. सभागृहाच्या निदर्शनास आणून देते.

प्र.आयुत : खाजगी ठेकेदाराकडून वाहन चालक लेबर घेवून काम करायचे असा ठराव आहे.

श्री. त्र्यबंक तूपे : ज्यांना काम करायचे तो ठेकेदार जेसीबी मशीन घेवू शकतो.

श्री.भगवान घडमोडे : यामूळे महापालिकेचा काहीही फायदा होणार नाही.

श्री.सलीम खान : हा प्रस्ताव रद्य करण्यात यावा.

श्री.सय्यद खुसरो : नाला सफाई करण्यासाठी जी मशीनरी घेण्यात यावी माझा वार्डात नाल्याच्या बाजूला वस्ती आहे लोकांना त्रास होतो. सफाई झाली पाहिजे.

श्री. साहेबराव कावडे : प्रस्ताव योग्य आहे मंजूर करावा.

श्री. सलीम खान : महानगरपालिकेने नाला सफाई करावी. खाजगी ठेकेदाराकडे वाहन देवू नये.

मा.महापौर : हा प्रस्ताव पूढील बैठकीत सविस्तर ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव पूढील सभेत सविस्तर ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

मा.महापौर : स.सदस्यांचे लेखाशिर्षक बदलण्याचे जे प्रस्ताव आहे ते सर्व मंजूर करण्यात येत आहे.

**विषय क्र. ६२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वॉर्डसाठी (वॉर्ड क्र.१८) येथे वाचनालयासाठी २ लाख रूपये मंजूर झाले होते. परंतु तेवढ्या रकमेत ते काम पूर्ण होत नाही. करीता पान क्र.डब्ल्यु १६९ वरील १.५० लाख एवढी रक्कम घेण्यात आली होती.

वाचनालयासाठी एकूण रक्कम ३.५० लाख मंजूर झाली. परंतू त्याऐवजी पवननगर के-४० समोरील खूल्या जागेत कंपाऊन्ड बांधणेकरीता ३ लाख ५० हजार रक्कम वळती करण्यात यावी, ही विनंती.

सुचक : श्री.अत्तरदे प्रकाश सुका	अनुमोदक : श्री.संजय केनेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१८ साठी अर्थसंकल्पात वाचनालयाकरीता असलेली तरतूद र.रू.२.०० लाख व पान क्र.डब्ल्यु १६९ वरील र.रू.१.५० लाख असे एकूण र.रू.३.५० लक्ष पवननगर के-४० समोरील खूल्या जागेत कंपाऊन्ड बांधणेकरीता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.७६ मध्ये विकास काम करण्याकरीता सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीतून सूचविल्याप्रमाणे काम करून लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात यावी.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु १७०/३ दि.११.०८.०६ रोजीचे इतिवृत्तानुसार बदल (नाला ट्रेनिंग) | श्रीराम प्रा.शाळा व हरीहरानंद कॉम्प्लेक्स जवळील नाल्यावर स्लॅब टाकणे - १५.०० लक्ष | **उद्यान विभाग** रामनगर प्रभागात वृक्ष संवर्धनाची व सुशोभिकरणाची विविध कामे करणे-१०.०० लक्ष |
| २ | डब्ल्यु १७२ (भांडवली कामे पाणी पुरवठा) | वार्ड क्र.७६ मध्ये जलकुंभ बांधणे-२०.०० लक्ष | **नविन कॉंक्रीट रस्ते** ✼ प्रभाग क्र.७६ अंतर्गत कॉंक्रीटीकरण करणे-१०.०० लक्ष ✼ प्रभाग क्र.७६ अंतर्गत मुख्य रस्त्याचेकॉंक्रेटींगकरणे-१०.०० लक्ष |
| ३ | डब्ल्यु १६६ (सेव्हरेज ट्रिटमेंट लॅण्ड विकसीत करणे) | सेव्हरेज ट्रिटमेंट लॅंड विकसीत करणे-२.०० कोटी | प्र.क्र.७६ मध्ये अंतर्गत मुख्य रोडच्या बाजूने गटार बांधणे व विविध कामे करणे-१०.०० लक्ष |

सुचक : श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात वार्ड क्र.७६ मध्ये विकास काम करण्याकरीता करण्यात आलेल्या तरतूदीत खालील सूचविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलून काम करण्यास मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु १७०/३ दि.११.०८.०६ रोजीचे इतिवृत्तानुसार बदल (नाला ट्रेनिंग) | श्रीराम प्रा.शाळा व हरीहरानंद कॉम्प्लेक्स जवळील नाल्यावर स्लॅब टाकणे - १५.०० लक्ष | **उद्यान विभाग** रामनगर प्रभागात वृक्ष संवर्धनाची व सुशोभिकरणाची विविध कामे करणे-१०.०० लक्ष |
| २ | डब्ल्यु १७२ (भांडवली कामे पाणी पुरवठा) | वार्ड क्र.७६ मध्ये जलकुंभ बांधणे-२०.०० लक्ष | **नविन कॉंक्रीट रस्ते** ✼ प्रभाग क्र.७६ अंतर्गत कॉंक्रीटीकरण करणे-१०.०० लक्ष ✼ प्रभाग क्र.७६ अंतर्गत मुख्य रस्त्याचेकॉंक्रेटींगकरणे-१०.०० लक्ष |
| ३ | डब्ल्यु १६६ (सेव्हरेज ट्रिटमेंट लॅण्ड विकसीत करणे) | सेव्हरेज ट्रिटमेंट लॅंड विकसीत करणे-२.०० कोटी | प्र.क्र.७६ मध्ये अंतर्गत मुख्य रोडच्या बाजूने गटार बांधणे व विविध कामे करणे-१०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७५ संजयनगर मुकुंदवाडी येथे ड्रेनेज लाईन आणि गटारीचे काम अतिक्रमण हटवून करण्यासाठी प्रभाग समिती दि.२७.०७.०६ अन्वये र.रू.५,००,०००/- अंदाज पत्रकास मंजुरी प्राप्त झालेली असून सदरील अंदाजपत्रकात रक्कम रूपये ३,९९,९६३.०० ची वाढ झाली असल्याने सुधारीत अंदाजपत्रक र.रू.८,९९,९३६.०० तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी दिनांक ०६.१०.०६ अन्वये मंजुरी दिलेली आहे. दोन लेखा शिर्षक मधून काम प्रस्तावित असल्याने व त्या लेखाशिर्षकाचे एकत्रिकरण करणेसाठी महाराष्ट्र अधिनियम सन १९४९ चे कलम १०३ अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे.

सदरचा खर्च सन ०५-०६ स्पील ओहर कामे र.रू.५,००,०००/- खुल्या गटारी व संरक्षित भिंत बांधणे (स्लम भाग) (पृष्ट क्र.डब्ल्यु.१८ अ.क्र.१७), आणि सन ०६-०७ मधील पाणी पुरवठा जलनि:सारण कामे स्लम या लेखा मधून ४,००,०००/- (पृष्ट क्र.डब्ल्यु. १२७ अ.क्र.६) असे एकूण ८,९९,९३६/- रूपयेचा करण्यात येईल.

सुचक : ०१.सौ.सरिता अशोक ससाणे

अनुमोदक : ०१.श्री.रेणुकादास वैद्य,०२.सौ.लता दलाल,०३.श्री.विनायक पांडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७५ संजयनगर मुकुंदवाडी येथे ड्रेनेज लाईन आणि गटारीचे काम करणेच्या सुधारीत र.रू.८,९९,९३६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च सन ०५-०६ स्पील ओहर कामे र.रू.५,००,०००/- खुल्या गटारी व संरक्षित भिंत बांधणे (स्लम भाग) (पृष्ट क्र.डब्ल्यु.१८ अ.क्र.१७), आणि सन ०६-०७ मधील पाणी पुरवठा जलनि:सारण कामे स्लम र.रू.४,००,०००/- (पृष्ट क्र.डब्ल्यु. १२७ अ.क्र.६) असे एकूण ८,९९,९३६/- या लेखाशिर्षा मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६ बेगमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पा.क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-४९ | **नवीन उद्याने**<br>निपट निरंजन परिसरात श्री.गोविंद हुंबे यांच्या घरासमोर उद्याने विकसीत करणे-२.५० लक्ष | वार्ड क्र६ मध्ये दत्तनगर विद्युत कॉलनी येथील बास्केट बॉल ग्राऊंडवर अद्ययावत ट्रीमिक्स फ्लोरींग करणे-२.५० लक्ष |
| डब्ल्यु-१५३ | २.वार्ड क्र.६ मध्ये विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे-४.०० लक्ष<br>या कामाऐवजी | १. वार्ड क्र.६ मध्ये विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे-३.०० लक्ष<br>२. दत्तनगर येथील बास्केट बॉल ग्राऊंडला फायबर बोर्ड बसविणे व पेंटींग करणे-१.०० लक्ष |

सुचक : श्री.विनायक पांडे		अनुमोदक : श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६ बेगमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-४९ | **नवीन उद्याने**<br>निपट निरंजन परिसरात श्री.गोविंद हुंबे यांच्या घरासमोर उद्याने विकसीत करणे-२.५० लक्ष | वार्ड क्र६ मध्ये दत्तनगर विद्युत कॉलनी येथील बास्केट बॉल ग्राऊंडवर अद्ययावत ट्रीमिक्स फ्लोरींग करणे-२.५० लक्ष |
| डब्ल्यु-१५३ | २.वार्ड क्र.६ मध्ये विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे-४.०० लक्ष<br>या कामाऐवजी | ३. वार्ड क्र.६ मध्ये विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे-३.०० लक्ष<br>४. दत्तनगर येथील बास्केट बॉल ग्राऊंडला फायबर बोर्ड बसविणे व पेंटींग करणे-१.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८६ मध्ये विकास काम करण्याकरिता सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात खालील कामासाठी तरतुद करण्यात आली आहे, सदर कामाचे लेखाशिर्ष बदलून तरतुदीतून खालील सुचविल्याप्रमाणे काम करण्यास मंजुरी देण्यात यावी.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु-१५२/४८ | वार्ड क्र.८६ मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे-१० लक्ष | वार्ड क्र.८६ मधील चाणक्यपुरी ते कासलीवाल पुरम डीपी रोडवर नविन पोलसह स्ट्रीट लाईट लावणे-५ लक्ष<br>वार्ड क्र.८६ मधील नुरी मस्जिद ते मायावती बौध्दविहार ते आलमगीर मस्जिद पर्यंत नविन पोलसह स्ट्रीट लाईट लावणे-५ लक्ष |
| २ | डब्ल्यु-१५७/४४ | वार्ड क्र.८६ मध्ये जलनि:सारण वाहीनी टाकणे-१० लक्ष | प्रियदर्शिनी इंदिरानगर मधील विविध गल्ल्यांमध्ये पेविंग ब्लॉक बसविणे-१० लक्ष |
| ३ | डब्ल्यु-१४३/३ | वार्ड क्र.८६ मधील प्रियदर्शिनी इंदिरानगर नुरीमस्जीद ते आलमगीर मस्जिद डांबरीकरणे करणे-८ लक्ष | वार्ड क्र.८६ मधील गुरूकृपा हाऊसिंग सोसा.मधील सहन जागेस कंपाऊंड वॉल बांधणे व सुशोभिकरण करणे तसेच पेविंग ब्लॉक बसविणे-६ लक्ष<br>वार्ड क्र.८६ मधील गुरूकृपा हाऊसिंग सोसा.मध्ये पोलसह स्ट्रीट लाईट बसविणे-२ लक्ष |

सुचक : सौ.वंदना खंदारे अनुमोदक : सौ.लता दलाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८६ साठी सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ प्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७३ येथील विहीरीवर मोटारी बसविणे व उद्यानात जलवाहिणी टाकण्यासाठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु ७६ अ.क्र.६ वर २.५ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. त्या ऐवजी वार्ड क्र.७३ मध्ये उर्जा बचत लाईट फिटींग बसविण्यात साठी केलेली तरतुदीचे लेखाशिर्षक बदलुन कामास मंजुरी देण्याकरिता प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७३ येथील विहीरीवर मोटारी बसविणे व उद्यानात जलवाहिणी टाकण्यासाठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु ७६ अ.क्र.६ वर असलेल्या तरतूदीमधून वार्ड क्र.७३ मध्ये उर्जा बचत लाईट फिटींग बसविण्यासाठी र.रू.२.५ लक्षची तरतूद वळती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २००६-०७ पान क्र.डब्ल्यु-३८ अ.क्र.२० वार्ड क्र.०९ शांतीपुरासाठी असलेली तरतुद र.रू.१५.०० लक्ष मधून र.रू.५.३५ लक्षाचे ड्रेनेज लाईनचे काम करण्यात आलेले आहे. सदर तरतुदीमधून र.रू.९.६५ लक्ष रक्कम उरलेली आहे. करीता उर्वरीत रक्कम रू.९.६५ लक्ष मधुन वार्ड क्र.०९ शांतीपुरा येथील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे र.रू.५.६५ लक्ष व वार्डामधील विविध गल्ल्यांमध्ये ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू.४.०० लक्ष वळती करणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.पुरूषोत्तम रघुविरसिंग ठाकुर अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २००६-०७ पान क्र.डब्ल्यु-३८ अ.क्र.२० वार्ड क्र.०९ शांतीपुरासाठी असलेली तरतुद र.रू.१५.०० लक्ष मधून र.रू.५.३५ लक्षाचे ड्रेनेज लाईनचे काम करण्यात आलेले असल्यामूळे, सदर तरतुदीमधून उर्वरीत असलेली र.रू.९.६५ लक्ष मधून वार्ड क्र.०९ शांतीपुरा येथील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे र.रू.५.६५ लक्ष व वार्डामधील विविध गल्ल्यांमध्ये ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू.४.०० लक्ष वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.डब्ल्यु-१०९ वर अनु.क्र.१ मध्ये स्लम भागात पुर्नडांबरीकरण शिर्षाखाली र.रू.१,००,०००/- एक लक्ष रू.ची तरतुद ठेवण्यात आली आहे या भागात डांबरीकरणाचे काम झालेले आहे. करिता सदरील रक्कमे मधून प्रभाग क्र.४३ मधील ड्रेनेज, रस्ते,कॉंक्रेटींग,गटारी आणि लोखंडी जाळी इत्यादी फुटकळ कामासाठी वळती करण्यात यावी. तरी लेखाशिर्षात बदल करून त्वरीत फुटकळ कामे करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.निसार खान मोहम्मद खान अनुमोदक : श्री.अमोदी अबुबकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.डब्ल्यु-१०९ वर अनु.क्र.१ मध्ये असलेली तरतूद र.रू.१,००,०००/- एक लक्ष **याऐवजी** प्रभाग क्र.४३ मधील ड्रेनेज, रस्ते,कॉंक्रेटींग,गटारी आणि लोखंडी जाळी इत्यादी फुटकळ कामासाठी वळती करण्यास व लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.११ भडकल गेट अंतर्गत जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी अर्थसंकल्प पुस्तक पा.क्र.डब्ल्यु-३६ वर अ.क्र.३९

नुसार र.रू.२,४०,०००/- तरतुद उपलब्ध आहे. या कामाऐवजी प्रभाग क्र.११ मधील मनपा कर्मचारी निवासस्थान परिसरात विविध कामे करणे यासाठी तरतुद वळती करण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरी द्यावी ही नम्र विनंती.

सुचक : सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना, श्रीमती मेहरून्नीसा बेगम अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.११ भडकल गेट अंतर्गत जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी अर्थसंकल्प पुस्तक पा.क्र.डब्ल्यु-३६ वर अ.क्र.३९ नुसार र.रू.२,४०,०००/- उपलब्ध तरतुद **या कामाऐवजी** प्रभाग क्र.११ मधील मनपा कर्मचारी निवासस्थान परिसरात विविध कामे करणेसाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.११ मध्ये अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये या आर्थिक वर्षात लेखाशिर्ष रस्ते दुरूस्ती पॅचवर्क (शहरी भाग) ची पान क्र.१४-८८ अ.क्र.६ मधील र.रू.१,००,०००/- ची तरतुद आहे सदर रकमेची वळती ही जलनि:सारण देखभाल दुरूस्ती कामासाठी मान्यता द्यावी ही विनंती

सुचक : सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.११ मध्ये अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये या आर्थिक वर्षात लेखाशिर्ष रस्ते दुरूस्ती पॅचवर्क (शहरी भाग) पान क्र.१४-८८ अ.क्र.६ मधील र.रू.१,००,०००/- ची तरतुद **याऐवजी** जलनि:सारण देखभाल दुरूस्ती कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ.क्र.१६४वर ''भांडवली कामे पाणी पुरवठा या शिर्षाखाली अ.क्र.७ वर वार्ड क्र.४२ मध्ये विविध ठिकाणी जल वाहिनी टाकणे'' या कामासाठी र.रू.५,००,०००/- पाच लक्ष रू.ची तरतुद करण्यात आली आहे. या लेखाशिर्षात खालील प्रमाणे बदल करण्यात यावा.

| सन ०६-०७ च्या अर्थसंकल्पातील तरतुद | लेखाशिर्ष बदलुन करावयाची तरतुद |
|---|---|
| पृष्ठक्र.डब्ल्यु-१६४ भांडवली कामे पाणी पुरवठा अ.क्र.७<br>वार्ड क्र.४२ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे र.रू.५,००,०००/- | १. वार्ड क्र.४२ मध्ये विविध ठिकाणी कूपनलीका बसविणे १,००,०००/-<br>२. वार्डक्र.४२मधीलपा.पु.वजलवाहिनीदेखभाल दुरूस्ती १,००,०००/-<br>३. मकसुदकॉलनी वार्डातील विहीरीवर विद्युत पंप बसविणे १,००,०००/-<br>४. वार्ड क्र.४२ मकसुद कॉलनी रोषनगेट भागात गटार दुरूस्ती, ड्रेनेज, रस्ते इ.दुरूस्ती देखभालीच्या फुटकळ कामासाठी र.रू.२,००,०००/-(दोन लक्ष रू.) |

तरी वरील प्रमाणे लेखाशिर्ष बदलुन विकास कामे करण्यासाठी सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान अनुमोदक : श्री.कैलास गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४२ साठी अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये पृष्ठ.क्र.१६४ अ.क्र.७ वर असलेल्या तदतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| सन ०६-०७ च्या अर्थसंकल्पातील तरतुद | लेखाशिर्ष बदलुन करावयाची तरतुद |
|---|---|
| पृष्ठक्र.डब्ल्यु-१६४ भांडवली कामे पाणी पुरवठा अ.क्र.७<br>वार्ड क्र.४२ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे र.रू.५,००,०००/- | ५. वार्ड क्र.४२ मध्ये विविध ठिकाणी कूपनलीका बसविणे १,००,०००/-<br>६. वार्ड क्र.४२ मधील पा.पु. व जलवाहिनी देखभाल दुरूस्ती १,००,०००/-<br>७. मकसुद कॉलनी वार्डातील विहीरीवर विद्युत पंप बसविणे १,००,०००/-<br>८. वार्ड क्र.४२ मकसुद कॉलनी रोषनगेट भागात गटार दुरूस्ती, ड्रेनेज, रस्ते इ.दुरूस्ती देखभालीच्या फुटकळ कामासाठी र.रू.२,००,०००/-(दोन लक्ष रू.) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

१. अ.क्र.१४ वरील डब्ल्यु-११९ राधामोहन कॉलनी येथील व्यास पिठास टिनचे शेड बसविणे साठी रू.१ लक्ष.
२. पृ.क्र.१७९ वार्ड क्र.५९ खोकडपुरा येथील राधामोहन कॉलनी येथे समाज मंदीर बांधणे. रू.३ लक्ष
३. पृ.क्र.१८२ वार्ड क्र.५९ खोकडपूरा येथील देवगिरी कॉलनी येथे समाज मंदीर बांधणे. रू.३ लक्ष.
४. पृ.क्र.१५९ वार्ड क्र.५९ मधील जालना रोड ते बंजारा कॉलनी रोड साईठ गटार बांधणे. रू.५ लक्ष.
५. प्र.क्र.५९ जलवाहिनी टाकणे बदलनेसाठी रू.१ लक्ष
६. अ.क्र.५ पृ.क्र.डब्ल्यु-५ प्रभाग क्र.५९ विविध शाळांना रंगरंगोटी करणेसाठी रू.१ लक्ष.
७. पृ.क्र.डब्ल्यु-१७ वार्ड क्र.५९ पांडुरंग कॉलनी येथील खुल्या जागेत पेव्हील ब्लॉक बसविणे.रू.२ लक्ष.

वरील एकुण १६ लक्ष रू.असलेली विकास कामांची तरतुद प्रभाग क्र.५९ जाफरगेट येथील आठवडी बाजारात ओटे दुरूस्ती व पेव्हील ब्लॉक बसविणे वळती करण्यासाठी मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सतिष कटकटे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.मोहन मेघावाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ७ प्रमाणे विविध कामासाठी असलेली र.रू.१६.०० लक्षची तरतूद **याऐवजी** प्रभाग क्र.५९ जाफरगेट येथील आठवडी बाजारात ओटे दुरूस्ती व पेव्हील ब्लॉक बसविणेकरीता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००६ ते २००७ बजेटमध्ये तरतुद करण्यात आलेली होती. कामाचे नांव प्रभाग क्र.३८ गांधीनगर मजीत समोर सेड टाकणे र.रू.१,००,०००/- (एक लाख) हे काम वार्डमध्ये करण्यास धार्मिक स्थळ असल्यामुळे सर्वसाधारण सभेची मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजु सुग्रीम रिडलॉन अनुमोदक : सौ.लता दलाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६ ते २००७ मध्ये प्रभाग क्र.३८ गांधीनगर साठी मस्जीद समोर शेड टाकणेस असलेली तरतूद र.रू.१,००,०००/- (एक लाख) मध्ये काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९५ पदमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-१६३ | **विकास इमारती शाळा व दवाखाने** वार्ड क्र.९५ मध्ये शाळा इमारत बांधणे-**१०.००** लक्ष सदरील काम रद्द करण्यात यावे. | वार्ड क्र.९५ मधील शालेय इमारतींची दुरूस्ती करणे-**५.००** लक्ष. |

सुचक : श्री.गजानन बारवाल अनुमोदक : सौ.शोभा हरिश्चंद्र मिटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९५ पदमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-१६३ | **विकास इमारती शाळा व दवाखाने** वार्ड क्र.९५ मध्ये शाळा इमारत बांधणे-**१०.००** लक्ष सदरील काम रद्द करण्यात यावे. | वार्ड क्र.९५ मधील शालेय इमारतींची दुरूस्ती करणे-**५.००** लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१८ येथे अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१७१ अ.क्र.१ वर एन-९ एम२ येथे भाजी मंडई बांधणे करीता १० लाख रूपये मंजुर झालेले आहे. परंतु त्या कामाऐवजी वार्ड क्र.१८ पवननगर येथे खुल्या जागेत सांस्कृतिक सभागृह बांधणे हे काम करण्यात यावे हि विनंती.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात यावा हि विनंती.

सुचक : श्री.अत्तरदे प्रकाश सुका अनुमोदक : श्री.सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१८ येथे अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१७१ अ.क्र.१ वर एन-९ एम २ येथे भाजी मंडई बांधणे करीता असलेली तरतूद र.रू.१०.०० लाख **याऐवजी** वार्ड क्र.१८ पवननगर येथे खुल्या जागेत सांस्कृतिक सभागृह बांधणे असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालनारोडवरील (बाबा पेट्रोल पंप) महावीर स्तंभ याचे सुशोभिकरण करणे बाबतचे जे अंदाजपत्रक तयार आहेत. त्यास लागणारी रक्कम नगर रचना विभागात स्टेअरकेसच्या एफ.एस.आय. मध्ये समावेश होत नाहीत. त्यांना १२% दंड लावण्यात येते. ह्या रकमे मधुन सदर काम करण्यात यावे.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा     अनुमोदक : श्रीमती अंजली कोंडेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालनारोडवरील (बाबा पेट्रोल पंप) महावीर स्तंभ याचे सुशोभिकरण करणेचे काम नगर रचना विभागात स्टेअरकेसच्या एफ.एस.आय. मध्ये समावेश होत नाहीत. त्यांना १२% दंड लावण्यात येते, ह्या रकमे मधुन सदर काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद मनपा हद्दीत पुर्वीच्या असलेल्या झुणका भाकर केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहे. तसेच दिनांक १३.१२.२००६ रोजी शासनाचे निर्देश आहेत की, पुर्वी परवानगी दिलेले झुणका भाकर केंद्र ताब्यात घेऊ नये.

करीता मनपा हद्दीत असलेल्या सर्व झुणका भाकर केंद्राना आहे त्या स्थितीत ठेवून मनपाच्या नियमाप्रमाणे भाडे आकारणी करण्यात यावी. जेणे करून मनपाचा आर्थिक फायदा होईल. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील     अनुमोदक : सौ.लता दलाल, श्री. पुरूषोत्तम ठाकुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत पुर्वीच्या असलेल्या झुणका भाकर केंद्रासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या जागा शासनाच्या दिनांक १३.१२.२००६ रोजीच्या निर्देशानुसार, पुर्वी परवानगी दिलेले झुणका भाकर केंद्र ताब्यात न घेता महानगरपालिका हद्दीत असलेल्या सर्व झुणका भाकर केंद्राना आहे, त्या स्थितीत ठेवून महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे भाडे आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१ येथे विविध देखभाल दुरूस्ती व ड्रेनेज काम करणे करिता खालील लेखाशिर्ष बदलण्याची परवानगी द्यावी. वार्ड क्र.१ येथे ड्रेनेज देखभाल दुरूस्ती करणे व इतर किरकोळ कामे करणे करिता खालील लेखाशिर्षक बदलण्याची परवानगी द्यावी.

लेखाशिर्षक :- नवीन खडी रस्ते (शहरी भाग) पान क्र.डब्ल्यु-८० अ.क्र.५ तरतुद २.०० लक्ष.

वरील लेखाशिर्षक बदलण्याची परवानगी द्यावी हि विनंती.

सुचक : श्री.पुनमचंद बमणे     अनुमोदक : श्री.मधुकर सावंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१ साठी अर्थसंकल्पात नवीन खडी रस्ते (शहरी भाग) पान क्र.डब्ल्यु-८० अ.क्र.५ तरतुद २.०० लक्ष. **याऐवजी** वार्ड क्र.१ येथे ड्रेनेज देखभाल दुरूस्ती करणे व इतर किरकोळ कामे करणे करिता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चालु अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये पान क्र.डब्ल्यु-१८१ वर स्मशानभुमी विकास अ.क्र.४ प्रभाग क्र.५५ चंपा मस्जीद समोरील कब्रस्तानमध्ये शेड टाकणे साठी रू.३ लक्षची तरतुद होती, पैकी सदर काम २.५ लक्ष मध्ये होत आहे करीता पैकी ५० हजार ही रक्कम वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रेटींगचे फुटकळ कामे करणेसाठी करून द्यावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर.

सुचक : श्री.सलीम पटेल अनुमोदक : श्री.किशोर तुलसीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये पान क्र.डब्ल्यु-१८१ वर स्मशानभुमी विकास अ.क्र.४ प्रभाग क्र.५५ चंपा मस्जीद समोरील कब्रस्तानमध्ये शेड टाकणे साठी ठेवण्यांत आलेली तरतूद र.रू.३.०० लक्ष मधील **उर्वरीत तरतूद र.रू.५०.०० हजार** ही वार्ड क्र.५५कैसरकॉलनी येथे सिमेंट कॉंक्रेटींगचे फुटकळ कामे करणेसाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७,भावसिंगपुरा गावा अंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविणे काम करणे करीता खालील लेखाशिर्षक.

१. १८ खेडी विकास कार्यक्रम (स्लम) : पान क्र.डब्ल्यु-७८ अ.क्र.१ -तरतुद १.०० लक्ष

२. नविन कॉंक्रीट रस्ते स्लम :पा.क्र. डब्ल्यु-७८ अ.क्र.१ -तरतुद १.०० लक्ष

३. स्लम देखभाल व दुरूस्ती :पान क्र.डब्ल्यु-८४ अ.क्र.१-तरतुद २.०० लक्ष

वरील तीन लेखाशिर्षकांचे एकत्रीकरण करून वरील काम करण्यासाठी परवानगी मिळावी हि विनंती.

सुचक : श्री.मिलींद दाभाडे अनुमोदक : श्री.मसरत युनुस पटेल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७,भावसिंगपुरा गावा अंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविणेकरीता प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ नुसार असलेल्या तरतूदीचे एकत्रीकरण करून काम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.५८ अंतर्गत कैलासनगर, दत्तनगर,दादा कॉलनी, ताराचंद पुनमचंद गिरणी एरिया हा भाग अत्यंत मागासलेला भाग असल्यामुळे ह्या भागात स्लम घोषीत करणे बाबत ह्या भागातील नागरीकांकडून सतत मागणी होत आहे. खरोखरच हा भाग मागासलेला असल्यामुळे सदरील भागास स्लम घोषीत करणे अत्यंत आवश्यक आहे.

करीता प्रभाग क्र.५८ अंतर्गत वरील भागास स्लम एरिया म्हणून घोषीत करण्यात यावा व तसा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यात यावा. प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :सौ.सरला सखाराम पोळ,श्री.कैलास गायकवाड अनुमोदक:श्री.संजु सुग्रीम रिडलॉन,श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५८ अंतर्गत कैलासनगर, दत्तनगर,दादा कॉलनी, ताराचंद पुनमचंद गिरणी या भागास स्लम म्हणून घोषीत करण्यास व तसा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-१८४, वर प्रभाग क्र.-५८ अंतर्गत विविध ठिकाणी विधंन विहीरी (बोरींग) करणे र.रू.०४ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु त्या कामाऐवजी प्रभाग क्र.-५८ अंतर्गत विविध रस्त्याचे पॅचवर्क (डांबरी) करणे या कामासाठी र.रू.०४ लाख वर्ग करण्यात यावे.प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सरला सखाराम पोळ अनुमोदक : श्री.संजु सुग्रीम रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-१८४, वर प्रभाग क्र.-५८ अंतर्गत विविध ठिकाणी विधंन विहीरी (बोरींग) करणे र.रू.४.०० लाख **याऐवजी** प्रभाग क्र.-५८ अंतर्गत विविध रस्त्याचे पॅचवर्क (डांबरी) करणे या कामासाठी र.रू.४.०० लाख वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९७ येथील मनपा अर्थसंकल्पातील खालील प्रमाणे कामाचे हेड चेंज करून सदरील रक्कम वर्ग करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

०१. प्रभाग ९७ अंतर्गत विविध ठिकाणी रस्ते तयार करणे पान क्र.डब्ल्यु१७५ र.रू.२.०० लक्ष

**ऐवजी**

प्रभाग क्र.९७ अंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविणे.

०२. प्रभाग ९७ मध्ये रस्त्याचे खडीकरण/डांबरीकरण करणे पान क्र.डब्ल्यु १५३ र.रू.४.०० लक्ष

**ऐवजी**

प्रभाग ९७ अंतर्गत ड्रेनेज लाईनच्या कामाकरिता र.रू.२.०० लक्ष वर्ग करणे.

सुचक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार अनुमोदक : श्री.जावेद कुरैशी,श्रीमती खान मेहरून्नीसा बेगम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९७ येथील मनपा अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. प्रभाग ९७ अंतर्गत विविध ठिकाणी रस्ते तयार करणे पान क्र.डब्ल्यु१७५ र.रू.२.०० लक्ष

**ऐवजी**

प्रभाग क्र.९७ अंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविणे.

०२. प्रभाग ९७ मध्ये रस्त्याचे खडीकरण/डांबरीकरण करणे पान क्र.डब्ल्यु १५३ र.रू.४.०० लक्ष

**ऐवजी**

प्रभाग ९७ अंतर्गत ड्रेनेज लाईनच्या कामाकरिता र.रू.२.०० लक्ष वर्ग करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मागील १० वर्षापासुन श्री.थोरपुरूष महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा बसवण्यात यावा अधी माझी व आमच्या समाज बांधवांची मनापासुन इच्छा आहे. त्या करीता एन-७, येथील हॉटेल शिदोरी समोरील आपली म.न.पा.ची मोकळी जागा भरपुर आहे. तसेच या पुतळ्याकरिता आपल्या अर्थसंकल्पात आर्थीक तरतुद आहे. या करीता आपणास असे नम्रपुर्वक निवेदन

करतो की, आपण प्रत्यक्ष जागेची पाहणी करून आमच्या समाजाच्या विनंतीस मान देऊन त्वरीत या जागेवर थोर पुरूष महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याची कारवाई करण्याचे आदेश प्रशासनास द्यावेत ही नम्र विनंती.

सुचक :श्री.कवरसिंग किसनसिंग बैनाडे ,श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.महेश माळवतकर

अनुमोदक : श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-७, येथील हॉटेल शिदोरी समोरील महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेत थोर पुरूष महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात या पुतळ्यासाठी असलेल्या तरतूदीमधून उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी विषय क्र.४४४ व ४८६ दि.२५.९.०६ रोजी झालेल्या सर्व साधारण सभेतील ठरावानुसार.

१. प्र.क्र.९८ नक्षत्रवाडी गावातील दलीत बांधव स्मशानभुमीचा अंतर्गत विकास करणे र.रू.२.०० लक्ष

२. प्र.क्र.९८ मध्ये विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनीमुळे खराब झालेल्या रस्त्याचे खडीकरण करणे व दुरूस्ती करणे. र.रू.२.०० लक्ष

३. शेकुदादा मोटे यांच्या घरापासून ते मनपा हद्दीपर्यंत साईड ड्रेन व डांबरीकरण करणे.र.रू.२.५० लक्ष

**ऐवजी**

१. वार्ड क्र.९८ मध्ये विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी अप्रुटींग करणे र.रू.२.५० लक्ष

२. वार्ड क्र.९८ मध्ये विविध भागातील उद्यानामध्ये खेळणी बसविणे र.रू.२.०० लक्ष

३. प्र.क्र.९८ नक्षत्रवाडी येथील लिंगायत समाज स्मशानभुमी विकसीत करणे र.रू.२.०० लक्ष

सुचक : सौ.अनिता घोडेले अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ नुसार वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा ठराव क्र.३९० दि.१७.०६.२००६ रोजीच्या सभेतील कांचनवाडी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज येथील पुतळ्या जवळ तार फेसिंग करणे र.रू.२.०० लक्ष **याऐवजी** नक्षत्रवाडी येथे १०० मी.मी.व्यासाची डी.आय.जलवाहीनी टाकणेसाठी (पुरक निधी) र.रू.१.२० लक्ष व प्रभाग क्र.९८ येथील उद्यानामध्ये विविध ठिकाणी लोंखडी बेंचेस टाकणे र.रू.८०.०० हजार वळती करणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा ठराव क्र.३९० दि.१७.०६.२००६ रोजीच्या सभेतील कांचनवाडी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज येथील पुतळ्या जवळ तार फेसिंग करणेसाठी ठेवण्यांत आलेली तरतूद र.रू.२.०० लक्ष **याऐवजी** नक्षत्रवाडी येथे १०० मी.मी.व्यासाची डी.आय.जलवाहीनी टाकणेसाठी (पुरक निधी) र.रू.१.२० लक्ष व प्रभाग क्र.९८ येथील

उद्यानामध्ये विविध ठिकाणी लोंखडी बेंचेस टाकणे र.रू.८०.०० हजार वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात दरवर्षी आंतरराष्ट्रीय किर्तीचे डॉ.शरदकुमार दिक्षित यांचे लायन्स क्लब या सामाजिक संघटनेमार्फत मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टीक सर्जरी शिबीराचे आयोजन करण्यात येते. मराठवाड्यातील गोरगरिब जनतेला याचा मोठ्या प्रमाणात फायदा होतो. अपघात, नैसर्गिक इत्यादी कारणामूळे निर्माण झालेले व्यंग दूर करून सामान्य माणसांच्या जीवनात आनंदाचा क्षण निर्माण करणारे डॉ.दिक्षित हे जणू मानवता यज्ञच करत असतात.

महानगरपालिकेचे सामाजिक कार्यात नेहमीच योगदान रहात आलेले आहेच. या दृष्टीकोनातून लायन्स क्लब मार्फत आयोजित डॉ.शरदकुमार दिक्षित यांच्या प्लॅस्टीक सर्जरी शिबीराला महानगरपालिके मार्फत र.रू.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक लाख फक्त) रूपयांची मदत करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजीव रिडलॉन अनुमोदक : श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे सामाजिक उत्तरदायित्व लक्षात घेवून लायन्स क्लब मार्फत आयोजीत डॉ.शरदकुमार दिक्षित यांच्या प्लॅस्टीक सर्जरी शिबीराला महानगरपालिके मार्फत र.रू.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक लाख फक्त) रूपयांची मदत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,आंबेडकर नगर,वार्ड क्र.२० मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याचे कामासाठी अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये पान क्र.डब्ल्यु-१०० वर रू.१०.० लक्ष ची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु सदर तरतुद पुरेशी नसल्यामुळे आंबेडकर नगर येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याचे कामासाठी खालील प्रमाणे तरतुद वळती करण्यात यावी.

१. पान क्र. डब्ल्यु-९५ वरील लेखाशिर्ष सुलभ सौचालय तरतुद रू.२.० लक्ष ठेवण्यात आलेली आहे. सदर रक्कम रस्त्याचे डांबरीकरणासाठी वळती करण्यात यावा.

२. पान क्र.डब्ल्यु-१०० वरील लेखाशिर्ष स्लम देखभाल दुरूस्ती अ.क्र.९ वार्ड क्र.२० मो.आंबेडकर नगर येथील डॉ.आंबेडकर पुतळ्या भोवती स्टेज बांधणे तरतुद रू.१.० लक्ष रस्त्याचे डांबरीकरणासाठी वळती करण्यात यावी.

३. पान क्र.डब्ल्यु १७९ वरील लेखाशिर्ष नविन पथदिवे व्यवस्था प्र.क.२० पिसादेवी रोड जंक्शन येथे डायमॉस्ट त्वरीत बसविणे साठी रू.८.० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यातील उर्वरीत ४.०० लक्ष रू. रस्त्याचे डांबरीकरणासाठी वळती करण्यात यावे.

तरी वरील प्रमाणे आर्थिक तरतुद वार्ड क्र.२० आंबेडकर नगर येथील मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्यासाठी करण्यात यावा ही विनंती.

सुचक : श्री.कचरू सोनवणे अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२० आंबेडकरनगर,मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याचे कामासाठी अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ मध्ये कामासाठी असलेली तरतूद वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.४९ मधील एन-६ सिडकोतील न्यु चैतन्य गृह निर्माण संस्था व साईकृपा गृह निर्माण संस्थामध्ये रस्ते तयार करण्याकरीता अर्थसंकल्पात रू.५.०० लाखाची तरतूद केलेली आहे. (डांबरीकरणाऐवजी पेव्हर ब्लॉक नविन कॉंक्रीटचे) (अर्थसंकल्प तरतूद पान क्र.डब्ल्यु. १६७ अ.क्र.१२ रू.५.०० लाख) असून वरील काम हेड चेंज करून त्वरीत काम करण्याचे आदेश द्यावेत, ही विनंती.

सुचक : श्री.कवंरसिंग किशनसिंग बैनाडे अनुमोदक : श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ साठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु. १६७ अ.क्र.१२ वर असलेली तरतूद र.रू.५.०० लाख एन-६ सिडकोतील न्यु चैतन्य गृह निर्माण संस्था व साईकृपा गृह निर्माण संस्थामध्ये डांबरीकरण रस्ते तयार करणे **याऐवजी** सदर ठिकाणी पेव्हर ब्लॉक नविन कॉंक्रीटचे बसविणे करीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वॉर्डात २००६-२००७ अर्थसंकल्पामध्ये विकास कामे ठेवण्यात आली होती. पान क्र.डब्ल्यु-५६ प्रभाग क्रमांक ३८ उद्यान विकसीत करणे रक्कम २५००००/- ह्या कामाची सध्या वॉर्डामध्ये गरज नसल्यामूळे ह्या कामा ऐवजी बापुनगर भागात गटार दुरूस्ती काम करून घेण्यात यावी. बापुनगर भागात गटार बांधणे ह्या कामासाठी खर्च करून घेण्यात यावे.

सुचक : श्री.संजु रिडलॉन अनुमोदक : श्री.विनायक पांडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८ साठी अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये पान क्र. डब्ल्यु-५६ वर असलेली तरतूद र.रू.२५००००/- **याऐवजी** बापुनगर भागात गटार बांधणे असे लेखाशिर्ष करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नविन औरंगाबाद येथील सिडको एन-७ जुने शॉपींग सेंटर समोरील जागेत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेसाठी सर्वसाधारण सभेत दि.१९.११.२००३ रोजी विषय क्र.१६७/५ अन्वये ठराव पारीत झाला आहे.

पुर्णाकृती पुतळ्याऐवजी भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात यावा, अशी दुरूस्ती उपरोक्त ठरावात करण्यात यावी. तसेच सदर काम त्वरीत हाती घेण्याचे ठरलेले असल्यामूळे ३१ मार्च २००७ पर्यंत प्रस्तुत कामासाठी लागणारा खर्च सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-२७ वरील पुतळे खरेदी व दुरूस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध असलेल्या एकूण रक्कम रू.४२.५० लक्ष मधून भागविण्याचे प्रस्तावित आहे. सदर काम पूर्ण करणेसाठी आवश्यक उर्वरीत रकमेची तरतूद आगामी अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात यावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विमल तुकाराम बेंद्रे,श्री.संतोष खेंडके अनुमोदक : श्री.महेश माळवतकर, श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नविन औरंगाबाद येथील सिडको एन-७ जुने शॉपींग सेंटर समोरील जागेत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेसाठी दि.१९.११.२००३ रोजीच्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.१६७/५ अन्वये मंजुरी झालेली आहे. तथापी पुर्णाकृती पुतळ्या ऐवजी भव्य अश्वारूढ पुतळा उभारणे अशा दुरूस्तीसह तसेच प्रस्तुत कामासाठी लागणारा खर्च सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-२७ वरील पुतळे खरेदी व दुरूस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध असलेल्या एकूण रक्कम रू.४२.५० लक्ष मधून करणेस आणि सदर काम पूर्ण करणेसाठी आवश्यक उर्वरीत रकमेची तरतूद आगामी अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रश्न :**

**चर्चा :**

श्री. गजानन बारवाल : स. सदस्य सौ. अनिता घोडेले यांनी गट नं. १०३ नक्षत्रवाडी येथील ४२ मीटरच्या रस्त्यावर संरभित भिंत बांधण्या बाबत प्रश्न विचारलेला होता.

श्री.संजय जोशी : तेथे डी. पी रोड प्रपोज आहे. प्रशासनाने त्या डी. पी रोडवर ११ महिण्यासाठीदिं. २८.८.२००६ रोजी कंपाऊट वॉल साठी परवानगी दिली. नियमाप्रमाणे डी. पी रोडवर परवानगी देवू शकत नाही.११ महिण्यात काय साध्य होणार आहे. परवानगी देण्याचे कारण काय. ११ महिण्यानंतर ही व्यती मा.न्यायालयात दाद मागेल व परवानगी दिली होती ती रद्य होवू नये हा माझ्यावर अन्याय होईल म्हणून मागणी करेल. व डी. पी रोड कदाचित रद्य होवू शकतो. असे अनेक ठिकाणी झालेले आहे काही ठिकाणचे पाडणे काही ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. शहरातील रस्ते सुटसूटीत ठेवायचे असेल व स्वच्छ शहर ठेवायचे असेल तर डी. पी रोडवरील परवानगी रद्य कराव्यात.

श्री. प्रशांत देसरडा : मा.आयुक्त यांनी नामंजूर केलेले असतांना डी.पी.रोडवर परवानगी देण्यात आली त्याची प्रत माझ्याकडे आहे तो ४५ मीटरचा डी. पी रोड आहे.

मा.महापौर : सहा. संचालक नगररचना यांनी खूलासा करावा.

सहा. संचालक(न.र.) : या संदर्भात स.सदस्य यांनी पत्र दिल्यानूसार त्यांना उत्तर दिलेले आहे. या प्रकरणात पहिल्यांदा परवानगी नाकारली होती. त्यानंतर त्या व्यतींनी शपथपत्र दिले .

श्री.संजय जोशी : ११ महिण्यासाठीच का परवानगी दिली. संशयास्पद वाटत आहे.डी. पी रोडवर अतिक्रमण होत असेल तर ती जबाबदारी महानगरपालिकेची आहे. जर अतिक्रमण झाले तर प्रपोजल मा. जिल्हाधिकारी यांचेकडे दिले जाते व ते जागा रिकामी करून देतात.

सहा.संचालक (न.र) : डी. सी रूल ६.६ नूसार मा.आयुक्त यांनी विशेष अधिकारात परवानगी दिलेली आहे.

श्री.संजय जोशी : रूल ६.६ नूसार मा.आयुक्त यांना तात्पूरती परवानगी देण्याचे अधिकार आहे परंतू डी.पी. रोडवर नाही.

सहा.संचालक (न.र) : महानगरपालिका जेंव्हा भूसंपादनाची कार्यवाही करेल तोपर्यत संबधीत व्यतीनी त्यांचे जागेची संरक्षण होण्यासाठी परवानगी मागविलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा : बांधकाम कशाचे केले आपल्या अधिकाऱ्यानी व्हिजीट दिली काय?

श्री.संजय जोशी : संरक्षित भिंतीची परवानगी दिलेली आहे तार कुपंनची नाही.

सहा.संचालक (न.र.) : तेथील जागेची भूसंपादनाची कार्यवाही आपणाकडून अद्याप सुरू झालेली नाही. म्हणून ११ महिण्यासाठी परवानगी दिली व तसे संबधीत व्यतीनी शपथपत्र दिले की मी कोणताही मावेजा मागणार नाही. जेंव्हा भिंत तोडावी लागेल तेंव्हा तो स्वत:तोडून देतील.

श्री.गजानन बारवाल : जेथे महापालिकेची जागा आहे तेथे लोकांनी अतिक्रमण केले ते काढू शकत नाही येथे तर बांधकाम झाल्यानंतर तो व्यती तोडू देईल का?बांधकाम परवानगी देतांना इतर विभागाची एन.ओसी घेण्याची गरज भासली नाही काय

श्री.संजय जोशी : महानगरपालिकेची डी. पी रोडची जागा सोडून संबधीत व्यतीने संरक्षित भिंत करावी असे आदेश करावेत.

मा.महापौर : प्रश्न क्र.६० नुसार स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अधारे जे काही प्रशासनाने उत्तर दिलेले आहे ते सभागृहाला मान्य नाही. म्हणून दिलेली परवानगी रद्य करण्यात येत आहे. तेथे संरक्षित भिंत बाधंण्यात येवू नये.

श्री.किशनचंद तणवानी : ही परवानगी रद्य केली तर जे भूखंडावर रिझर्वेशनचे जे आहे ती का रद्य करण्यात येत नाही.

मा.महापौर : ती सूध्दा परवानगी रद्य करण्यात येते.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.